cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१०० | मंगळवार दि.३० जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### श्रद्धेच्या विश्वासघाताची शिक्षा कोणाला?

अयोध्येतील प्रभू श्रीरामचंद्रांचे भव्य मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नाही, तर भारताच्या सांस्कृतिक अस्मितेचे, कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचे आणि शतकानुशतके चाललेल्या संघर्षाच्या विजयाचे प्रतीक आहे. या मंदिरासाठी देशातील गरीब, शेतकरी, कामगार, मध्यमवर्गीय अशा सर्व स्तरांतील नागरिकांनी आपल्या कष्टाच्या कमाईतून देणग्या दिल्या. त्यामुळे मंदिरातील प्रत्येक रुपया हा केवळ आर्थिक व्यवहार नसून तो श्रद्धेचा आणि विश्वासाचा ठेवा आहे.

# शेतकरी पुन्हा सावकारीच्या विळख्यात

## सावकारांकडील कर्जात ४०० कोटींची वाढ; सरकारवर विरोधकांचा हल्लाबोल

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकरी पुन्हा एकदा सावकारीच्या विळख्यात अडकत असल्याचे चित्र सोमवारी (२९ जून) विधानसभेत समोर आले. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनीच सभागृहात दिलेल्या आकडेवारीनुसार, २०२२ पासून आतापर्यंत परवानाधारक सावकारांनी दिलेल्या कर्जात तब्बल ४०० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. ही बाब सरकारच्या कृषी व सहकार धोरणावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी असल्याची टीका विरोधकांनी केली.**




अमरावतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके यांनी अवैध सावकारीच्या वाढत्या प्रकरणांचा मुद्दा उपस्थित करत सरकारकिला धारेवर धरले. त्यानंतर काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी शेतकऱ्यांच्या बिकट परिस्थितीकडे लक्ष वेधत, ''शेतकऱ्यांना किडनी विकावी लागत आहे, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. हा शेतकऱ्यांच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. सरकार सावकारांच्या लुटीला आळा घालणार की नाही?'' असा थेट सवाल केला. यावर उत्तर देताना सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी राज्यात डिसेंबर २०२५ अखेर १२ हजार २११ परवानाधारक सावकार असल्याचे सांगितले. या सावकारांनी ५ लाख ५४ हजार ९५० कर्जदारांना १,२८७.९३ कोटी रुपयांचे कर्ज दिल्याची माहिती त्यांनी दिली. २०२२ नंतर सावकारांच्या कर्जवाटपात ४०० कोटी रुपयांची वाढ झाल्याची कबुलीही त्यांनी सभागृहात दिली. याच काळात बँकांनी शेतकऱ्यांना १२ हजार ४१५ कोटी रुपयांचे कर्ज दिल्याचेही त्यांनी नमूद केले. विरोधकांनी मात्र सरकारच्या दाव्यांवर समाधान व्यक्त केले नाही. बँकांकडून वेळेवर आणि पुरेसे कर्ज न मिळाल्यामुळेच शेतकऱ्यांना सावकारांचे दरवाजे ठोठवावे लागत असल्याचा आरोप त्यांनी केला. सरकारकडून विविध योजना जाहीर होत असल्या तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांची आर्थिक अडचण कायम असल्यामुळे सावकारीचे जाळे अधिक मजबूत होत असल्याची ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### आता माघार घेणार नाही–सोनम वांगचुक

दिल्लीः प्रसिद्ध पर्यावरण कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचूक यांनी सोमवारी (दि.२९) सोमवारपासून येथील जंतरमंतरवर आंदोलनादरम्यान आमरण उपोषण सुरू केले आहे. आंदोलनाच्या मार्गावर आपल्याला पुन्हा कधीच परतावे लागू नये, अशी आशा होती; परंतु लडाखच्या जनतेला दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण न झाल्याने आणि केंद्र सरकारसोबतची चर्चा ठप्प झाल्याने आंदोलनाशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिला नाही, असे वांगचूक यांनी स्पष्ट केले आहे. वांगचुक यांनी म्हटले आहे की, ''माझा अजूनही चर्चेवर पूर्ण विश्वास आहे. या उपोषणामुळे सरकारसोबतची थांबलेली चर्चा पुन्हा सुरू होईल, अशी आशा आहे. मला पुन्हा आंदोलनाला बसावे लागेल असे वाटले नव्हते. पुन्हा उपोषणाला बसावे लागत असल्याबद्दल मला खेद वाटतो आहे. मी हे आनंदाने करत नाही आणि हे सोपेही नाही. यात माझा जीवही जाऊ शकतो, पण जीव गेला तरी मी आता पाऊल मागे घेणार नाही, असा निर्धार सोनम वांगचूक यांनी व्यक्त केला.

### अवैध सावकारीविरोधी कायदा आणखी कडक

मुंबईः राज्यातील बेकायदेशीर सावकारीला आळा घालण्यासाठी कायद्यात आणखी कडक तरतुदी करण्यात येणार असून पूर्वीच्या कायद्यापेक्षा अधिक कठोर शिक्षा देण्याची तरतूद नव्या कायद्यात केली जाईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांना सुलभ कर्ज पुरवठा, बेकायदेशीर सावकारीवर कठोर नियंत्रण आणि तक्रारींवर प्रभावी कारवाई करून शेतकऱ्यांचे हित जोपासण्यास राज्य शासनाने सर्वोच प्राधान्य दिले आहे. कोणताही पात्र शेतकरी कर्जापासून वंचित राहणार नाही असे सांगत मंत्री पाटील म्हणाले की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कर्ज थकीत असल्यामुळे ज्या शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज मिळण्यात अडचणी येत आहेत, अशा शेतकऱ्यांना राष्ट्रीयीकृत बँका व इतर पात्र बँकांच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

### जैन अल्पसंख्याक मंडळाला १०० कोटींचा निधी

दिल्लीः महाराष्ट्र शासनाच्या जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाने भारत सरकारच्या राष्ट्रीय महामंडळासोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार केला असून, या कराराअंतर्गत महामंडळाला १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. या निधीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जैन अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला चालना देण्याबरोबरच युवकांच्या नवउद्योगांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच उद्योग, धार्मिक आणि सामाजिक विकासाशी संबंधित विविध उपक्रमांसाठीही या निधीचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी दिली.

# मराठी न शिकविणाऱ्या शाळांची दंडासह मान्यता रद्द होणार!

## राज्यात मराठी भाषा सक्तीचा कायदा लागू–शिक्षण मंत्री दादाजी भुसे

मुंबई । प्रतिनिधी




राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा शिकविणे बंधनकारक आहे. मराठी न शिकवणाऱ्या शाळांवर एक लाख रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येईल. त्यानंतरही नियमांचे पालन न झाल्यास संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत सांगितले.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे म्हणाले की, मराठी भाषा सक्तीचा कायदा लागू करण्यात आल्याने राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी शिकविणे अनिवार्य आहे. मराठी विषय शिकविण्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेले शिक्षक नियुक्त करणेही शाळांसाठी बंधनकारक केले आहे. त्यामुळे शाळा तपासणी व भेटीदरम्यान मराठी विषयाच्या अध्यापनाची तसेच प्रत्येक वर्गातील मराठी परीक्षेची पडताळणी ▶▶ पान २ वर

# टीईटीच्या पेपरफुटीवरून दोन्ही सभागृहात गोंधळ

## ● चर्चेसाठी विरोधक आग्रही

मुंबई । प्रतिनिधी

**एकामागून एक पेपरफुटीच्या घटना राज्यात होत असतानाच २८ जूनला होणाऱ्या टीईटीच्या परीक्षेचा पेपर २७ जूनलाच फुटल्याने त्या परीक्षा अचानक रद्द करण्यात आल्या. त्यामुळे शिक्षक होऊ पाहणाऱ्यांचे अनेकांचे स्वप्न भंगले. या पेपरफुटी वरून विरोधकांनी सर्व कामकाज बाजूला ठेऊन स्थगन प्रस्ताव मांडत याप्रश्नी चर्चा करावी, अशी मागणी विरोधकांनी केली.**

विधानसभेत शिवसेना उबाठाचे आमदार भास्कर जाधव आणि काँग्रेसच्या विजय वडेट्टीवार यांनी केली, तर विधान परिषदेत शिवसेना उबाठाचे अंबादास दानवे यांच्यासह विरोधी पक्षाच्या आमदारांनी केली. विधान परिषदेत मात्र सभापती राम शिंदे यांनी विरोधकांची मागणी फेटाळून लावली, त्यामुळे सभागृहात गोंधळ निर्माण झाला. यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले. तर विधानसभेत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हा विरोधकांनी मांडलेला प्रस्ताव योग्य नसल्याचे कारण पुढे करत विरोधकांचा प्रस्ताव फेटाळून लावत या प्रश्नी शालेय शिक्षण मंत्र्यांना निवेदन करण्याचे आदेश दिले. दरम्यान विधान परिषदेत शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी याबाबत शासन करत असलेल्या कारवाईची सभागृहात माहिती दिली. मात्र विरोधकांनी सभापतींच्या कृतीचा निषेध करत आपली मागणी कायम ठेवण्यासाठी सभागृहात घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे सभापती राम शिंदे यांनी अखेर सभागृहाचे कामकाज अर्धा तासासाठी तहकूब करत असल्याचे जाहीर केले. महाराष्ट्र टीईटी परीक्षा २८ जून २०२६ रोजी विविध परीक्षा केंद्रांवर होणार होती. मात्र, परीक्षेच्या केवळ एक दिवस आधी महाराष्ट्र टीईटी पेपरफुटी झाल्याचे वृत्त आले. परीक्षेच्या अवघ्या २४ तास आधी भिवंडीत पेपरफुटी झाली. या पेपरफुटीनंतर शिक्षण विभागाने शिक्षक पात्रता परीक्षा रद्द केली. महाराष्ट्र टीईटी पेपरफुटीची तक्रार पोलिसांकडे करण्यात आली होती. ठाण्यात एका कारवाईनंतर पोलिसांनी पेपर ▶▶ पान २ वर

# चिमुकलीला न्याय; बलात्काऱ्याला फाशीची शिक्षा

## ● पुणे न्यायालयाचा अवघ्या दोन महिन्यांत ऐतिहासिक निकाल

पुणे । प्रतिनिधी



नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याप्रकरणी आरोपी भीमराव कांबळे (वय ६५) याला न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयाने सोमवार हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. यापूर्वी न्यायालयाने भीमराव कांबळेला दोषी ठरविले होते. त्यानंतर त्याला फाशीची शिक्षा होणार की जन्मठेप, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. अखेर न्यायालयाने हा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याचे नमूद करत आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली आहे.

या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, गुन्हा घडल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत तपास, पुरावे आणि न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून निकाल देण्यात आला. त्यामुळे अत्याचार आणि हत्या प्रकरणातील राज्यातील सर्वात जलदगतीने निकाली निघालेल्या खटल्यांपैकी हा एक ठरला आहे. १ मे महाराष्ट्र दिनी पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या मुलीवर लैंगिक ▶▶ पान २ वर

# राम मंदिर देणगी वाद : तातडीच्या सुनावणीची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळली

दिल्ली । वृत्तसंस्था

'या प्रकरणात एवढी घाई कशासाठी?'', असा सवाल करत अयोध्या येथील राम मंदिरासाठी भाविकांकडून मिळालेल्या देणग्यांमध्ये अनियमितता असल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सोमवारी (दि.२९) सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. न्यायालयाची सुट्टी संपल्यानंतरच हे प्रकरण सुनावणीसाठी ठेवले जाईल, असे स्पष्ट केले.

याचिकाकर्त्याने राम मंदिरासाठी मिळालेल्या देणग्यांच्या कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी सीबीआयच्या नेतृत्वाखालील विशेष तपास पथक स्थापन करण्याच्या मागणीसाठी तातडीच्या सुनावणीची विनंती केली होती. यावर न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील




नागू यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. राम मंदिरासाठी मिळालेल्या देणग्यांच्या कथित गैरव्यवहाराचे आरोप हे अत्यंत गंभीर आहेत, उत्तर प्रदेश सरकार ज्या पद्धतीने हे प्रकरण हाताळत आहे, त्यावरून संशय निर्माण होतो, असा युक्तिवाद याचिकाकर्त्याने केला. यावर न्यायमूर्ती सुंदरेश यांनी विचारले, ''या प्रकरणात एवढी घाई कशासाठी? ▶▶ पान २ वर

# राज्यात आजपासून पावसाचा जोर वाढणार

## हवामान खात्याचा येलो अलर्ट जारी, शेतकऱ्यांना दिलासा मिळणार

मुंबई । प्रतिनिधी

राज्यभर समाधानकारक पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. यातच आज मंगळवारपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सोमवारी मध्यरात्रीपासून मुंबईत पुन्हा एकदा दमदार पावसाने हजेरी लावली.

मुंबईसह कोकणपट्टीत आणि घाटमाथ्यावर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम किनारपट्टी, संपूर्ण कोकण आणि सह्याद्रीच्या घाटभागात २९ जून ते २ जुलै या काळात पावसाचा जोर वाढेल. बंगालच्या उपसागरात तयार होणाऱ्या हवामान प्रणालीमुळे १ आणि २ जुलै या कालावधीत ▶▶ पान २ वर

# विलास घुले हत्याकांडाला धक्कादायक वळण

## 'संबंध ठेव नाहीतर कुटुंबाला मारून टाकू' पीडितेचा उमेश मानेवर खळबळजनक आरोप

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील टाकळी येथे २० जूनच्या रात्री घडलेल्या विलास घुले हत्याकांडाला आता एका पीडित महिलेच्या वक्तव्यामुळे अत्यंत धक्कादायक वळण मिळाले आहे. या प्रकरणात केवळ किरकोळ वाद किंवा मध्यस्थीचा विषय नसून, महिला छळ, आक्षेपार्ह व्हिडिओद्वारे ब्लॅकमेलिंग आणि सततच्या अत्याचाराची काळी बाजू कारणीभूत असल्याचा खळबळजनक आरोप एका स्थानिक महिलेने केला आहे. संशयित उमेश माने याने जबरदस्तीने अत्याचार करून आक्षेपार्ह व्हिडिओ बनवले आणि ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार छळ केल्याचा दावा या महिलेने केला आहे. या त्रासाला कंटाळून प्रतिकार करतानाच हॉटेलवर झालेल्या झटापटीत विलास घुलेचा मृत्यू झाल्याचे पीडितेने सांगितले आहे. ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२५ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ९४.०० क्विंटल | २,३५० | २,६५० | २,४६३ |
| ज्वारी/हायब्रिड : ९०.०० क्विंटल | २,३०० | ३,००० | २,६३२ |
| मका/लोकलः ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : १२.५० क्विंटल | ६,२६२ | ६,२६२ | ६,२६२ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५०१ | ६,५०१ |
| बाजरीः ८३.५० क्विंटल | २,००० | ३,६६१ | २,७५२ |
| मुगः ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीनः७.५० क्विंटल | ६,५०० | ६,६०० | ६,५५० |
| हरभराः १०.०० क्विंटल | ५,२७१ | ५,४३० | ५,३५० |


# आरक्षणातील उपवर्गीकरण विरोधात विधान भवनावर आज मोर्चा!

## २७ आमदारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र; बदर समितीचा अहवाल रद्द करण्याची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

**अनुसूचित जाती (एससी) आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण कमालीचे तापले आहे. या प्रस्तावित उपवर्गीकरणाला तीव्र विरोध करण्यासाठी मंगळवारी ३० जून रोजी विधान भवनावर भव्य मोर्चा धडकणार आहे. या पार्श्वभूमीवर, अनुसूचित जातीच्या २७ आमदारांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपली नाराजी व्यक्त केली.**

आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयामुळे अनुसूचित जातींमध्ये फूट पडू शकते आणि समाजात अंतर्गत संघर्ष निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करत या २७ आमदारांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना संयुक्त स्वाक्षरीचे निवेदन सादर केल्याची माहिती माजी सामाजिक न्याय मंत्री आमदार राजकुमार बडोले यांनी विधानभवनात पत्रकारांशी बोलताना दिली. यावेळी बोलताना राजकुमार बडोले म्हणाले की, सर्वपक्षीय आरक्षण समन्वय समितीने यापुर्वीच उपवर्गीकरणाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, माजी




न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर समितीचा अहवाल तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी प्रमुख मागणी लावून धरली आहे. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची (अ, ब, क, ड) प्रस्तावित प्रक्रिया तात्काळ स्थगित करून ती कायमस्वरूपी रद्द करावी, अशी मागणी आमदारांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. तसेच, माजी न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर समितीचा संपूर्ण अहवाल, 'बार्टी'चा अहवाल, सर्व मूळ आकडेवारी, संशोधन पद्धती, सर्वेक्षण अहवाल, बैठकींचे इतिवृत्त आणि शिफारशी सरकारने तात्काळ सार्वजनिक करण्यात यावी, अशी मागणी करत अहवाल सार्वजनिक केल्याशिवाय कोणतीही पुढील कार्यवाही करू नये, अशी भूमिका घेतली असल्याचे बडोले यांनी सांगितले. पुढे बोलताना राजकुमार बडोले म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात स्वतंत्र बैठक घेण्याचे आश्वासन दिले आहे. अनुसूचित जाती साठी १३ टक्के आरक्षण आहे व ते ५९ जातींना दिले जाते. याला ५८ जातींचा पाठींबा आहे. या संदर्भात विधानसभा अध्यक्षांची भेट घेऊन या मुद्द्यावर सभागृहात स्थगन प्रस्ताव आणि अल्पकालीन चर्चा लावण्याची मागणी करण्यात ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# श्रद्धेच्या विश्वासघाताची शिक्षा कोणाला?

अयोध्येतील प्रभू श्रीरामचंद्रांचे भव्य मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नाही, तर भारताच्या सांस्कृतिक अस्मितेचे, कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचे आणि शतकानुशतके चाललेल्या संघर्षाच्या विजयाचे प्रतीक आहे. या मंदिरासाठी देशातील गरीब, शेतकरी, कामगार, मध्यमवर्गीय अशा सर्व स्तरांतील नागरिकांनी आपल्या कष्टाच्या कमाईतून देणग्या दिल्या. त्यामुळे मंदिरातील प्रत्येक रुपया हा केवळ आर्थिक व्यवहार नसून तो श्रद्धेचा आणि विश्वासाचा ठेवा आहे. अशा पवित्र दानराशीच्या अपहारप्रकरणी आठ जणांना अटक होणे ही केवळ गुन्हेगारी घटना नसून संपूर्ण समाजाच्या धार्मिक भावनांवर झालेला गंभीर आघात आहे.

या प्रकरणातील आरोपी हे श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे निकटवर्तीय किंवा नातेवाईक असल्याचे समोर येत आहे. त्यानंतर ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांनी दिलेले राजीनामे अनेक प्रश्न निर्माण करतात. नैतिक जबाबदारी स्वीकारणे स्वागतार्ह असले तरी केवळ राजीनामे म्हणजे उत्तरदायित्वाची समाप्ती नव्हे. सत्य काय आहे, जबाबदार कोण आहे आणि अपहाराची साखळी किती खोलवर पोहोचली आहे, याची निष्पक्ष चौकशी होणे तितकेच आवश्यक आहे. राम मंदिराच्या नावाने जनतेकडून जमा झालेल्या निधीवर डल्ला मारणे म्हणजे कोट्यवधी रामभक्तांच्या विश्वासालाच तडा देणे होय. श्रद्धेच्या नावाने जमा झालेल्या प्रत्येक पैशामागे एखाद्या गरीब कुटुंबाचा त्याग, एखाद्या वृद्धाची भावना किंवा एखाद्या बालकाची भक्ती दडलेली आहे. त्यामुळे हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नाही; हा समाजाच्या नैतिक मूल्यांवर झालेला हल्ला आहे. या प्रकरणामुळे मंदिर व्यवस्थापनातील पारदर्शकतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अंतर्गत लेखापरीक्षणात यापूर्वीच रोख रकमेची मोजणी, सोन्या-चांदीच्या वस्तूंची नोंद, मालमत्ता व्यवहार आणि आर्थिक व्यवस्थापनाबाबत त्रुटी असल्याच्या सूचना दिल्या गेल्याचे सांगितले जाते. जर त्या वेळी आवश्यक सुधारणा झाल्या असत्या, तर आजची परिस्थिती कदाचित उद्भवली नसती. धार्मिक संस्थांमध्येही आधुनिक, पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवस्थापनाची गरज किती महत्त्वाची आहे, हे या घटनेने अधोरेखित केले आहे.ङ्ग्याहून महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या प्रकरणावर राजकीय स्तरावर दिसणारे मौन. भ्रष्टाचाराच्या इतर घटनांवर तातडीने प्रतिक्रिया देणारे अनेक नेते या विषयावर संयम बाळगताना दिसत आहेत. कोणत्याही राजकीय पक्षासाठी किंवा सरकारसाठी श्रद्धेच्या प्रश्नावर निवडक भूमिका घेणे योग्य ठरणार नाही. कायद्यापुढे सर्व समान असले पाहिजेत. मंदिर असो किंवा मशिद, गुरुद्वारा असो किंवा चर्चधार्मिक संस्थांतील आर्थिक गैरव्यवहारांवर समान निकष लावले गेले पाहिजेत. तेव्हाच लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल.

उत्तर प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाकडून या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी होणे आवश्यक आहे. दोषी कोणत्याही स्तरावरील असोत, त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी मंदिराच्या आर्थिक व्यवहारांचे नियमित स्वतंत्र लेखापरीक्षण, डिजिटल नोंदणी व्यवस्था आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाची यंत्रणा उभारणेही तितकेच गरजेचे आहे. प्रभू श्रीराम हे सत्य, न्याय, मर्यादा आणि धर्माचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या मंदिराशी संबंधित प्रत्येक व्यवहारही त्याच मूल्यांवर आधारित असणे अपेक्षित आहे. श्रद्धेचे रक्षण केवळ भव्य मंदिर उभारून होत नाही; तर त्या मंदिरातील प्रत्येक व्यवहार निष्कलंक, पारदर्शक आणि विश्वासार्ह ठेवूनच होते. म्हणूनच या प्रकरणातील सत्य जनतेसमोर येणे, दोषींना कठोर शिक्षा होणे आणि मंदिर व्यवस्थापनात आवश्यक सुधारणा करणे, हेच खऱ्या अर्थाने रामभक्तीचे आणि रामराज्याच्या संकल्पनेचे पालन ठरेल.

# व्यसनधीनता एक गंभीर मानसिक आजार मानसोपचार तज्ज्ञ-डॉ.जगदीश टेकाळे

## दारु पिणे,सिगारेट ओढणे, चरस,गांजा,नशेच्या गोळ्यांचे सेवन ही मनोविकारांची लक्षणे वेळीच,योग्य उपचाराने ९५% रुग्ण होतात बरे, अन्यथा भयंकर दुष्परिणाम

**बीड । प्रतिनिधी**

वाढती व्यसनाधीनता हे वाढत्या गुन्हेगारीचे एक प्रमुख कारण बनले आहे. मात्र, दारू पिणे, सिगारेट ओढणे, चरस, गांजा, नशेच्या गोळ्यांचे सेवन हे मनोविकार आहे, हे लोकांना माहीतच नाही. त्यामुळे नशा करणारे व्यक्ती हळूहळू या मादक पदार्थांच्या आहारी जाऊन व्यसनाधीन बनतात. त्यातून अनेक जण हिंसक होऊन जीवघेणा हल्ला, खून हे असे अनेक समाजघातक कृत्ये घडतात. तर वेळीच आणि योग्य उपचाराने ९५ टक्के रुग्ण बरे होऊन मानसिक आणि सामाजिक स्वास्थही सुदृढ होते.

**वाईट सवय म्हणून वाऱ्यावर सोडू नका!**

व्यसनाधीनता हे मानसिक आजार असल्याने वेळीच, योग्य औषधोपचाराने बराही होऊ शकतो. त्यामुळे त्याला वाईट सवय लागली, तो वाया गेला. असे समजून त्याला वाऱ्यावर न सोडता नशेखोरीच्या या संकटातून सावरण्याची संधी आणि आधार द्या. यासाठी मानसोपचार तज्ज्ञांच्या मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन डॉ.टेकाळे यांनी केले.

**दारू पिणे, सिगारेट ओढणे हे मानसिक आजार आहेत ?**

होय, तंबाखूसह बिडी, सिगारेट, बियर, दारू, गांजा, भांग, अफू या नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन हे मानसिक आजाराच आहेत. नशेच्या गोळ्या घेणे हे सुद्धा एक घातक मनोविकार अनेकांना जडला आहे. झिंग येण्यासाठी इतरही अनेक घटक, पदार्थांचा सर्रास वापर होतो. वेळीच, योग्य औषधोपचाराने हे रोखता येते.

**व्यसनांची सवय लागते कशी ?**

सुरुवातीला केवळ मौजमजा, जिज्ञासा किंवा फक्त टेन्शन आले म्हणून अमली पदार्थांची चव चाखणारे नंतर हळूहळू या गर्तेत आपोआपच अडकतात. स्पर्धेचे युग, कामांचा ताण, बिघडलेली जीवनशैली यामुळेही नशेखोरीत गुरफटले जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यात मग झोपडपट्टीपासून ते उच्चभ्रू लोकही आहेत. अनेक तरुण कधी मित्रांच्या आग्रहापोटी तर, काही वेळा अभ्यास करताना झोप येऊ नये म्हणून विद्यार्थी अमली पदार्थांचे सेवन करतात. हे प्रमाण आता वाढत चालले आहे.

**व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम कोणते ?**

व्यसनाधीनताही गंभीर समस्या असून याचे अनेक दुष्परिणामही आहेत. मादक पदार्थांच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते. त्यातून दुखणे, कुटुंब कलह, घटस्फोट त्यापुढे समाज घातक कृत्ये नशेखोरीतून घडतात. याचे अनेक उदाहरणे आहेत. व्यसनाधीन व्यक्तीने जीवघेणा हल्ला, खून केल्याच्या अनेक घटना रोजच्याच झाल्या आहेत.



**तरुणवर्ग व्यसनांमध्ये गुरफटतोय ?**

भावनिक चलबिचलता आणि जीवनात थ्रिल म्हणून किशोरवयीन मुलांमध्ये नशेखोरीचे प्रमाण वाढत आहे. अगदी शाळकरी मुलेसुद्धा आता सिगारेट, बियर, दारूचे सेवन करू लागले आहे. त्यापुढे गांजा, चरस, अफू, कोकिन, नशेच्या गोळ्यांची चटक बहुसंख्य युवापिढीला लागली आहे. तरुण मुलीही या विळख्यात अडकत असल्याने याकडे पालकांनी, समाजाने लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

**व्यसनांना नाही कसे म्हणायचे?**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यसनांच्या सवयी लागण्याआधीच नाही म्हणायचे. दुसरे म्हणजे व्यसनांपासून मुक्त झाल्यावर मनाचा ठाम निश्चय करा. मित्रांनी, कुणी आग्रह धरला तर सरळ आणि स्पष्ट शब्दांत नाही म्हणा. कुटुंबीयांसोबत वेळ घालवा. सतत कामांत व्यस्त आणि स्वस्थ रहा.

**नशेखोरीतून गुन्हेगारी फोफावते ?**

नशेच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे मानसिक व शारीरिक संतुलन बिघडते. नशा करण्यासाठी अमली पदार्थ मिळाले नाही की मग चिडचिड, हिंसकवृत्ती, नशा भागवण्यासाठी चोरी, गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावते. हे त्या व्यक्तीसाठी, कुटुंब आणि समाजासाठी अत्यंत घातक आहे.

**पालकांनी काय काळजी घ्यावी?**

पालकांनी मुलांकडे विशेष लक्ष द्यावे, ते इंटरनेटचा काय वापर करतात, मोबाईलवर काय बघतात, मित्र कोण आहेत. याची माहिती घेत राहावी, मुलांसोबत गप्पा माराव्या, त्यांना बोलते करावे. मैदानी खेळ खेळावे. गायन, वादन आणि वाचनासह आवडते छंद जोपासावे.

**औषधोपचाराने व्यसने सोडता येतात ?**

होय, व्यसन करणे हे मनोविकार असल्याने त्यानुसार आजार समजूनच शारीरिक व मानसिक औषधोपचार केले जातात.व्यसने सोडू शकतो, याचा विश्वास निर्माण करून आध्यात्मिक शिक्षणाच्या जोडीने प्रेमळ आणि सुरक्षित वातावरण दिले जाते. त्यांच्यातील कलागुण ओळखून त्यानुसार कामांमध्ये व्यस्त ठेवून व्यसनाशिवायही आनंदी जीवन जगता येते. हे मनावर ठामपणे बिंबवले जाते. सातत्याने काही दिवसांत व्यसनाधीन व्यक्ती व्यसनमुक्त होतो.

**मानसिक आजारांविषयी समज-गैरसमज ?**

होय, समाज प्रगत झाला तरी आजही मानसिक आजारांविषयी अनेक समज-गैरसमज आहेत. महत्वाचे म्हणजे व्यवसनाधीनता हे मानसिक आजार असल्याचे लोकांना माहीतच नाही. औषधोपचाराने दारु, सिगारेट,चरस , गांजा, नशेच्या गोळ्यांचे इतकेच नव्हे तर ऑनलाईन गेमिंग आणि सतत मोबाईलमध्ये गुंग असणारेही या जोखडातून सुटले नाही. व्यसनांना पहिल्यांदाच नाही म्हणा आज घडीला हजारो-लाखो तरुण नशेखोरीत गुरफटल्याने गुन्हेगारीच्या अनेक घटना घडत आहेत. याचे दुष्परिणाम भयंकर आहेत. व्यसनांमुळे शारीरिक,मानसिक,,आर्थिक आणि कौटुंबिक हानी होते. योग्य मार्गदर्शन आणि उपचाराने या विळख्यातून बाहेर पडता येते. परंतु पहिल्यांदाच व्यसनांना नाही म्हणणे हे त्याहून चांगले असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली नवी शाखा सुरू; गावपातळीवर शिवसेनेचा विस्तार!

## ख.लिंमगाव येथे शिवसेना शाखेचे उत्साहात उद्घाटन ; नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती, ज्येष्ठ शिवसैनिकांचा सन्मान!

**बीड । प्रतिनिधी**

**हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या हिंदुत्ववादी आणि जनसेवेच्या विचारांनी प्रेरित होत तसेच शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब, शिवसेना संसदीय गटनेते मा. खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब आणि शिवसेना बीड लोकसभा संपर्कप्रमुख श्री. मनोजजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत ख. लिंमगाव (ता. वडवणी, जि. बीड) येथे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या शिवसेना शाखेचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. हा कार्यक्रम शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली पार पडला.**



यावेळी शाखेच्या संघटनात्मक बांधणीसाठी विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. त्यामध्ये श्री. गणेश यादव व श्री. बाळासाहेब घाटुळे यांची मार्गदर्शक म्हणून, श्री. बाळू चांदर यांची शाखाप्रमुख, श्री. संतोष निर्मळ यांची उपशाखाप्रमुख, श्री. विजयसिंह फरताडे यांची शाखा सचिव तर श्री. बाळासाहेब चांदर यांची शाखा सहसचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच विविध सदस्यांवर संघटन विस्ताराची जबाबदारी सोपविण्यात आली. कार्यक्रमात शिवसेनेच्या वाढीसाठी आणि संघटन मजबूत करण्यासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ शिवसैनिकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. या उद्घाटन सोहळ्यास शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, शिवसेना शेतकरी सेल जिल्हाप्रमुख बापूसाहेब जाधव, उपजिल्हाप्रमुख संदीप माने, विधानसभा प्रमुख रामदास ढगे, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर (माऊली) गोंडे, उपतालुकाप्रमुख बाळासाहेब बादाडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिवसेनेची विचारधारा घराघरात पोहोचवून संघटन अधिक सक्षम करण्याचा तसेच जनसेवा अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# गायरान जमिनीच्या वादातून पती-पत्नीला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी

**घनसावंगी । प्रतिनिधी**

**गायरान जमिनीच्या वादातून पती-पत्नीला मारहाण करून जीव मारण्याची धमकी पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी नसता पोलीस अधीक्षक यांची भेट घेणार. यमाजी बापुराव वाघमारे व त्यांच्या पत्नीस शिविगाळ व मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. घनसावंगी तालुक्यातील गुरुपिंप्रि येथील रहिवासी यमाजी बापुराव वाघमारे जातीने मागासवर्गीय चांभार समाजांचे आहेत मागील चाळीस वर्षांपासून मौजे गुरुपिंप्री येथील गायरान जमिन वहिती करून आपल्या कुटुंबाची उदाहारनिर्वाह करीत आहेत आज रोजी गायरान जमिन वहिती आहे त्यांना राहण्यासाठी लाकडी गोठा करून राहात आहेत .**

दिनांक ११/०६/२०२६ रोजी गांवातील ईसम भाऊसाहेब अर्जून साबळे, अर्जुन साबळे , भिमराव योहान साबळे , अशोक एकनाथ साबळे, यांनी संगनमत करुन यमाजी बापुराव वाघमारे यांना शिविगाळ करून जिवे मारण्यांची धमकी देण्यात आली सदरील घटनेची फिर्याद देण्यासाठी यमाजी वाघमारे यांनी पोलीस ठाणे घनसावंगी येथे एन,सी,आर, नोंद केल्यामुळे हा राग मनात धरुन सदरील नातेवाईक महिला यांनी सगनमत करून यमाजी वाघमारे यांची पत्नी जिजाबाई वाघमारे यांना दिनांक १२/०६/२०२६ रोजी गायरान जमिनी मध्ये जाऊन त्यांच्य राहत्या घरापासी जाऊन गांवातील महिला सरस्वती बाळु साबळे, लता जगन साबळे ,कूशिवर्ता पाजगे , राधा भिमराव साबळे, यांनी संगनमत जिजाबाई वाघमारे यांना शिविगाळ करून लाकडी टीपरांने बेदम मारहाण केली सदरील घटनेची फिर्याद पोलीस ठाणे घनसावंगी येथे जाऊन एन,सी,आर, नोंद करण्यात आला पोलीसांकडून तशी कारवाई करण्यात आले नाही म्हणून सदरील घटना घडली. सदरील व्यक्तीवर कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे नसता पोलीस अधीक्षक यांची भेट घेणार आहे असे असे सांगण्यात आले. पद्धतीने गून्हा नोंद करण्यात आला नाही पुन्हा यांचा फायदा घेऊन वरिल सर्व आरोपी महिला व पुरुष यांनी सगनमत करून जमिनीची मोजणी करून दहशत निर्माण केली व सदरील गायरान जमिन वहिती करित असलेले यमाजी वाघमारे व त्यांची पत्नी जिजाबाई वाघमारे तूम्ही वहिती करित असलेली जमिन आम्हाला द्या नाही दिल्यास तुमचे राहणे अवघड होईल. अशा पद्धतीने धमक्या देत आहे. दहशत निर्माण केली जात आहे . आम्हाला न्याय मिळावा या साठी पोलीस अधिक्षक यांची भेट घेणार आहे.

## पान १ वरून...

### शेतकरी पुन्हा सावकारीच्या

टीका करण्यात आली. दरम्यान, सावकारांसाठी व्याजदर निश्चित करण्यात आले असून जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्यांमार्फत देखरेख केली जात असल्याचा दावा सरकारने केला. मात्र, सभागृहात झालेल्या चर्चेत विरोधकांनी सरकारच्या या उपाययोजनांवर प्रश्न उपस्थित करत, आकडेवारीच राज्यातील शेतकरी पुन्हा सावकारांच्या विळख्यात अडकत असल्याचा पुरावा असल्याचा आरोप केला. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकारीतून मुक्त करण्यासाठी केवळ नियम नव्हे, तर प्रभावी आर्थिक धोरण आणि बँकिंग व्यवस्था सक्षम करण्याची गरज असल्याची मागणीही करण्यात आली. सावकारी कर्जामध्ये ४०० कोटी रुपयांची वाढ झाली. याचाच अर्थ अवैध सावकारी जिवंत असून, त्यात वाढ होत आहे हे सरकारने मान्य केले. यावर कायमस्वरुपी उपाय का निघत नाही? असा प्रश्न आमदार विजय वडेट्टीवार यांनी सरकारला विचारला. बिनापरवानाधारक सावकारांकडून शेतकऱ्यांनी कर्ज घेतली. यावर आपण कारवाई करु शकत नाही. कारण ते चिठ्ठीवर कर्ज देतात. कोणताही लेखाजोखा ठेवत नाहीत. अव्वासव्वा व्याज घेतात. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी एक हेल्पलाईन नंबर सुरु करावा. अवैध सावकारांची तक्रार आल्यानंतर कारवाई करणार का? असा प्रश्न मुर्तिजापूरचे आमदार हरीष पिंपळे यांनी केला.

----------

### टीईटीच्या पेपरफुटीवरून

जप्त केला. या प्रकरणी अनेक व्यक्तींना ताब्यातही घेण्यात आले. नीटच्या पेपरफुटीनंतर अनेकांवर कारवाई होऊनही महाराष्ट्र टीईटी पेपर फुटीचे गंभीर प्रकरण घडल्याने विरोधकांनी २८९ अंतर्गत चर्चेची मागणी केली होती. ज्येष्ठ सदस्य अंबादास दानवे म्हणाले की, भिवंडीसारख्या ठिकाणी टीईटीचा पेपर फुटला. या प्रकरणात कोट्यवधी रुपयांच्या बाबी समोर आल्या. यात खरे तर पोलिसांचे अभिनंदन केले पाहिजे. राज्यात शिक्षण व्यवस्था वा परीक्षापद्धती सडलेली आहे. उत्तम शिक्षक निवडण्याची ही परीक्षा पहिली पायरी आहे. पण त्याच वेळी शिक्षक होणाऱ्यांचे स्पप्न भंग पावले. पालक आणि विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. परीक्षांचे पेपर फोडण्याचे हे मोठे रॅकेट आहे. शिक्षण विभागामार्फत ही परीक्षा होते आणि याला शिक्षणमंत्री पूर्णतः जबाबदार असून त्यांना या पदावर राहण्याचा अधिकार नाही, असा हल्लाबोल अंबादास दानवे यांनी केला. सहा लाख विद्यार्थ्यांची हे सरकार परीक्षा घेऊ शकत नसेल तर महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेचे हे सरकार कसे भले करणार, असा सवाल केला. यातील आरोपी कुठे पळून गेले, शिक्षण खात्यातील यात कोण कोण जबाबदार आहेत याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. तर विधानसभेत काँग्रेसचे विजय वडेट्टीवार म्हणाले की, यापूर्वी विद्यार्थ्यांच्या नीट परिक्षेचा पेपर फुटला म्हणून केंद्र सरकारचा विषय असतानाही विधानसभेत निवेदन करायला लावले. मात्र टीईटीची परिक्षा ही पुर्णतः राज्याचा विषय असताना त्यावर साधी विधानसभेत चर्चाही होत नाही आणि त्यावर फक्त निवेदन करण्याबाबत विचार केला जात असले तर ते चुकीचे असल्याचे सांगत सर्व कामकाज बाजूला सारून स्थगन प्रस्तावातंर्गत सविस्तर चर्चा करावी अशी मागणी केली. यावेळी काँग्रेसचे सतेज पाटील म्हणाले की, एखादी परीक्षा घेणे सर्वोच्च न्यायालय बंधनकारक करते तेव्हा ती परीक्षा व्यवस्थित घेणे ही राज्यशासनाची जबाबदारी आहे. तेरा कोटी जनतेचे भले करण्याच्या आणाभाका घेणारो हे सरकार सहा लाख विद्यार्थ्यांची साधी परीक्षा घेऊ शकत असेल तर त्याला काय म्हणावे? पुणे महापालिकेत पेपर फुटला. त्यामुळे आज आंदोलन सुरू झाले. विद्यापीठातही पेपर फुटला. नीटपासून सीबीएसपर्यंत पेपर फोडण्यात कोणाचे लागेबांधे आहेत त्याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी सतेज पाटील यांनी केली. ठाकरे गटाचे जगन्नाथ अभ्यंकर यांनी या प्रकरणात शिक्षण व्यवस्थेवर बोट ठेवले. त्यांनी या प्रकरणात झालेल्या देवघेवीच्या व्यवहाराचे धनादेश क्रमांक, कोड नंबर आणि नावेही सांगितली. सुधाकर आडबाले, धीरज लिंगाडे, संजय घोडके यांनीही या सभागृहात याबाबत प्रश्न उपस्थित केले. दरम्यान, शिक्षण मंत्री दादा भुसे म्हणाले की, टीईटीचे पेपर फुटले ही बाब गंभीर आहे. पोलीस प्रशासनाने हा प्रकार उघडकीस आणला. त्याबाबत आपण विस्तृत विवरण करणार आहोत. याची एसआयटी चौकशी करण्यात येणार आहे.

-------------

### मराठी न शिकविणाऱ्या शाळांची

केली जाणार आहे. पुढे बोलताना दादा भुसे म्हणाले की, अभ्यासक्रमात राज्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाला अधिक स्थान देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य नव्या अभ्यासक्रमात अधिक प्रभावीपणे समाविष्ट करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याबरोबरच राज्यातील विद्यार्थ्यांना महापुरुषांचे कार्य आणि विचार अधिक व्यापकपणे समजावेत यासाठी नव्या अभ्यासक्रमात महाराष्ट्रातील मानबिंदूंचा इतिहास आणि कार्याचा समावेश करण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगितले. दादा भुसे पुढे बोलताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रमात अधिक व्यापक स्वरूपात समाविष्ट करण्यात आला असून हा इतिहास आता अधिक विस्तृत स्वरूपात देशभरातील विद्यार्थ्यांना शिकविला जाणार आहे. मराठी भाषा ही राज्याच्या अस्मितेचा विषय असल्याचे सांगत शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले की, राष्ट्रगीतानंतर 'जय जय महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत सन्मानपूर्वक गायले जावे, याबाबतही शासनाने सर्व शाळांना स्पष्ट निर्देश दिले असल्याचे सांगितले. सदस्य अतुल भातखळकर यांनी या संदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य वरुण सरदेसाई, सुनील प्रभू, डॉ. नितीन राऊत आणि रत्नाकर गुट्टे यांनी उपप्रश्न केले.

-----------

### राम मंदिर देणगी वाद : तातडीच्या

'' अखेरीस न्यायालयाने सांगितले की, न्यायालयाची सुट्टी संपल्यानंतरच हे प्रकरण सुनावणीसाठी ठेवले जाईल, असे खंडपीठाने स्पष्ट केले. अयोध्यामधील श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या कारभारात आणि मंदिरासाठी मिळालेल्या देणग्यांच्या वापरात आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोपासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्या तआली आहे. याचिकाकर्त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष, कालमर्यादित आणि व्यावसायिक चौकशी करण्याची मागणी केली आहे. लाखो भाविकांची श्रद्धा आणि देणगीदारांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी पारदर्शक चौकशी आवश्यक असल्याचेही याचिकेत नमूद केले आहे. मात्र, या आरोपांबाबत अद्याप कोणताही न्यायालयीन निष्कर्ष निघालेला नाही. जनहित जपण्यासाठी देखरेख, लेखापरीक्षण (ऑडिट) आणि पर्यवेक्षणाची प्रभावी यंत्रणा अंमलात आणण्याचे निर्देश केंद्र सरकार, उत्तर प्रदेश सरकार आणि श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट यांना द्यावेत, अशी विनंती याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. देणगीबाबत आरोप खरे ठरले, तर या प्रकरणात केवळ आर्थिक अनियमितता नाही, तर लाखो भाविकांच्या भावना आणि श्रद्धेचाही प्रश्न गुंतलेला आहे, असे याचिकेत म्हटले आहे. मंदिर ट्रस्टच्या विनंतीवरून उत्तर प्रदेश सरकारने १३ जून रोजी एका विशेष तपास पथकाची स्थापना केली. या पथकात लखनौचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत, पोलीस महानिरीक्षक किरण एस. आणि विशेष सचिव (वित्त विभाग) नील रतन यांचा समावेश आहे. हे पथक आर्थिक अनियमिततेच्या आरोपांची चौकशी करत आहे. मात्र, याचिकाकर्त्यांचा असा युक्तिवाद आहे की, कोणतीही गुन्हा दाखल न करताच एसआयटीने चौकशी सुरू केली, ज्यामुळे या प्रक्रियेच्या निष्पक्षतेबद्दल सवाल केले जात आहेत.

**सीबीआय चौकशीची मागणी**

याचिकाकर्त्यांच्या मते, या प्रकरणात गुंतागुंतीचे आर्थिक व्यवहार आणि संभाव्य गुन्हेगारी पैलूंचा समावेश आहे. त्यामुळे, केवळ प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या एसआयटीऐवजी, लोकांचा विश्वास वाढवण्यासाठी सीबीआयच्या नेतृत्वाखालील तपास पथकाची नेमणूक व्हावी, अशी त्यांची मागणी आहे. एखाद्या व्यावसायिक आणि स्वतंत्र संस्थेद्वारे चौकशी झाल्यास तथ्यांची निष्पक्ष तपासणी सुनिश्चित होईल, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

--------------

### चिमुकलीला न्याय; बलात्काऱ्याला

अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. या अमानुष घटनेनंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. विविध सामाजिक संघटना, नागरिक आणि राजकीय पक्षांनी आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली होती. त्यानंतर पोलिसांनी वेगाने तपास पूर्ण करत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी पक्षाने सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले आणि आता त्याला फाशीची शिक्षा सुनावली आहे. या निकालामुळे पीडित कुटुंबाला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत असली, तरी अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर अंमलबजावणी आणि समाजात जनजागृती होण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, शिक्षेचा निर्णय घेताना आरोपीचे वय, मानसिक स्थिती, गुन्ह्याचे स्वरूप आणि परिस्थिती यांचा विचार करण्यात आला. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, या प्रकरणात आरोपीच्या बाजूने कोणतीही विशेष सुट देणारी परिस्थिती दिसून आली नाही. हा गुन्हा अत्यंत क्रूर, अमानवीय आणि समाजमन हादरवणारा असल्याचे न्यायालयाने नमूद केले. गुन्ह्याचा समाजावर झालेला परिणामही शिक्षा निश्चित करताना विचारात घेण्यात आला. न्यायालयाने स्पष्ट केले की, ''जितका गंभीर गुन्हा, तितकी कठोर शिक्षा'' हे तत्त्व लागू होते. विविध प्रकरणांमधील न्यायनिवाड्यांचा आढावा घेतल्यानंतर न्यायालयाने हा गुन्हा रेअरेस्ट ऑफ रेअर श्रेणीत मोडत असल्याचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने नमूद केले की, नियोजनपूर्वक, मानसिक आणि शारीरिक अत्याचार करून केलेले गुन्हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे असतात. तसेच आरोपी मानसिक रुग्ण असल्यास त्याची वेगळी कायदेशीर तपासणी होऊ शकते; मात्र गुन्हा हा गुन्हाच असतो, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. सर्व कायदेशीर बाबी, पुरावे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकषांचा विचार करून न्यायालयाने आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यास पात्र ठरवले.

---------------

### विलास घुले हत्याकांडाला

पीडित महिलेने दिलेल्या माहितीनुसार, विलास घुलेचा मित्र उमेश माने याने धमकी देत अनेकदा तिच्यावर अत्याचार केला. या छळाबाबत कुटुंब पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी जात असताना रमेश घुले याने मध्यस्थी करत पोलिसांत न जाण्यासाठी धमकावले होते. या भीतीने कुटुंबाने शेतातील घर सोडून गावात धाव घेतली, तरीही विलास घुले आणि उमेश माने यांचा त्रास थांबला नाही. ३ जून रोजी विलास घुले याने पूर्वीसारखेच संबंध ठेवण्यासाठी नवऱ्याला व मुलांना मारून टाकण्याची थेट धमकी दिली होती. २० जूनच्या रात्री आरोपींनी पुन्हा घरासमोर येऊन शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या त्रासातून मार्ग काढण्यासाठी आणि त्यांना समजावून सांगण्यासाठी पीडितेचे वडील व पती हॉटेलवर गेले असता, तिथे विलास आणि उमेश यांनी काचेच्या बाटल्या आणि विटांच्या तुकड्यांनी कुटुंबाला बेदम मारहाण सुरू केली. स्वतःच्या आणि कुटुंबाच्या बचावासाठी वडिलांनी केलेल्या प्रतिकारात विलास घुलेचा जागीच मृत्यू झाला, असा दावा महिलेने केला आहे. या संपूर्ण संवेदनशील प्रकरणात पीडित महिलेने स्थानिक पोलीस प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. छळ आणि धमकीबाबत केज आणि बीड पोलीस ठाण्यात वारंवार दाद मागूनही पोलिसांनी अद्याप त्यांची अधिकृत तक्रार नोंदवून घेतलेली नाही. यापूर्वी २० जूनच्या विलास घुलेच्या हात्येच्या घटनेनंतर मुख्य आरोपींच्या अटकेसाठी बीडमध्ये प्रचंड जनक्षोभ उसळला होता आणि तब्बल नऊ तास मृतदेह पोलीस ठाण्यासमोर ठेवून नातेवाईकांनी आंदोलन केले होते. पोलिसांनी आतापर्यंत या प्रकरणात वेगाने तपास करून दहा आरोपींना अटक केली आहे, मात्र पीडितेच्या या नव्या आणि गंभीर खुलाशामुळे बीड पोलिसांसमोर या तपासाचे एक मोठे आणि नवे आव्हान उभे ठाकले आहे.

-------------

### राज्यात आजपासून पावसाचा

तळकोकण, गोवा तसेच मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत पावसाचा जोर वाढलेला असेल. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मुंबईसह कोकण विदर्भात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर विदर्भातील अमरावती जिल्ह्यासाठी जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करत ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. राज्यातील इतर भागांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता असल्याने येलो अलर्ट देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रातील लोणावळा येथे राज्यातील सर्वाधिक ६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. इतर भागांतही हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळल्या. पुणे जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांतही जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान, जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा जोर जास्त राहणार असल्याचा अंदाज आहे. काही दिवसांपूर्वी नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी संपूर्ण महाराष्ट्र व्यापला असला तरी त्यानंतर मान्सूनची पुढील वाटचाल मंदावली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील दोन ते तीन दिवसांत गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या काही भागांत मान्सून पुढे सरकण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यातही पावसाचा जोर वाढण्याची अपेक्षा आहे.

------------

### आरक्षणातील उपवर्गीकरण विरोधात विधान

आली असून, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनाही या संदर्भातील मागण्यांचे निवेदन देण्यात आल्याचे सांगितले. विधानभवनावर निघणाऱ्या या महामोर्चाचे नेतृत्व आनंदराज आंबेडकर करणार असून, यामध्ये अनुसूचित जातीतील विविध संघटना तसेच माजी आमदार बाबुराव माने यांची संघटना, माजी मंत्रा बबनराव घोलप यांची संघटना, बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडीया आणि सर्वपक्षीय आमदार मोठ्या संख्येने सहभागी होतील, असेही बडोले आणि बनसोडे यांनी सांगितले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. ३० जून २०२६



## थोडक्यात

### काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी राहुल जाधव यांची तिसऱ्यांदा निवड

पाटोदा । प्रतिनिधी

संघटन सृजन अभियाना अंतर्गत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निरीक्षकांनी जिल्ह्यांमध्ये भेटी देऊन जिल्ह्यातील काँग्रेस नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून ब्लॉक अध्यक्ष नियुक्ती संदर्भात प्रदेश कार्यालयाकडे दिलेल्या शिफारशी विचारात घेता तसेच मा. प्रांताध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून काँग्रेस पक्षाच्या पाटोदा तालुक्याध्यक्षपदी राहुल शाहुराव जाधव यांची तिसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आली.



अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. खा. श्री. मल्लिकार्जुन खरगेजी, लोकसभेचे विरोधी पक्षनेते मा. खा. श्री. राहुलजी गांधी यांचे कार्य व काँग्रेस पक्षाचे पुरोगामी विचार तळागळापर्यंत पोहोचविण्यासाठी पदाधिकाऱ्या निवड व काँग्रेस पक्ष संघटना मजबुतीने उभी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने मागील काही दिवसांमध्ये काँग्रेसच्या संघटनात्मक कार्यकारणी बदलामध्ये राज्यभरामध्ये निवड करण्यात आली. यामध्ये पाटोदा तालुकाध्यक्षपदी राहुल शाहुराव जाधव यांची कामाची दाखल घेत तिस-यांदा निवड केली याबद्दल काँग्रेसच्या माजी खासदार तथा हिमाचल प्रदेश चे प्रभारी रजनीताई पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री अशोकराव पाटील, आदीत्य पाटील यांच्या आदेशाने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी पाटोदा तालुक्यामध्ये अनेक वर्षापासून काँग्रेसचे संघटन वाढवण्यामध्ये अग्रेसर असणारे ज्यांचे एकनिष्ठ राहिलेले राहुल जाधव यांची तिसऱ्यांदा निवड केली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष हसवर्धन सपकाळ, अशोक रावजी पाटील साहेब, आदित्य दादा पाटील जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी राहुल जाधव यांची निवड झाल्या बद्दल अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



### रोहन बहीर व डॉ. संजय तांदळे यांचा सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० जाहीर झाल्यानंतर प्रथमच राज्यातील प्राथमिक स्तरावरील बालभारतीच्या वतीने इयत्ता दुसरी,तिसरी,चौथी आणि सहावी चे पाठ्यपुस्तके नव्याने प्रकाशित झाली आहेत.यावर्षी बीड जिल्ह्यातील आनंदाची गोष्ट म्हणजे सुप्रसिद्ध लेखक व शिक्षणतज्ञ दिलीप फलटणकर यांनी लिहिलेल्या धाडसी रोहन हा पाठ इयत्ता सहावीच्या बालभारतीत प्रकाशित झाला आहे. अतिशय सोपी भाषा आणि आशयधन भाषेमुळे मुलांना हा पाठ भावनारा झाला आहे. बीड तालुक्यातील नवगणराजुरी येथील रोहन रामचंद्र बहीर यांने स्वतःच्या जीवाची परवा न करता पुरात वाहून जाणाऱ्या महिलेला वाचवले या मुलाचे शौर्य कथन करणारा हा पाठ आहे. त्यावेळी रोहन बहीर हा नवगणराजुरी येथील गजानन महाविद्यालयात शिक्षण घेत होता. त्याचे वडील शेतकरी असून आई राधाबाई या गावात आरोग्य सेविका म्हणून कार्यरत आहेत. बीडचे ज्येष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे यांनी २०२३ च्या पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी प्रयत्न करूनही त्याचे नाव निवड यादी मध्ये न आल्याने व पूर्वीचे दोन बालकांचे बाल शौर्य पुरस्कार अपात्र केल्याने,शेवटच्या आठ दिवसांमध्ये शेवटचा प्रयत्न म्हणून रोहन बहिरचा प्रस्ताव शौर्य पुरस्कार साठी पात्र असताना देखील तो निवड समितीने नाकारल्याबद्दल पंतप्रधान,केंद्रीय गृहमंत्री व महिला बालकल्याण मंत्री यांना जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत पाठवलेल्या निवेदनाद्वारे २६ जानेवारी रोजी नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे आमरण उपोषणांचा इशारा निवेदनाद्वारे दिल्यानंतरच २२ जानेवारी रोजी रोहनची निवड पंतप्रधान राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कारासाठी झाल्याचे केंद्राचे पत्र जिल्हा अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर रोहन व त्यांचे पालक नवी दिल्लीकडे दुसऱ्या दिवशी रवाना झाले.२५ व २६ जानेवारी रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराने रोहन बहीर यास सन्मानित करण्यात आले. नंतर राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त दिलीप फलटणकर यांनी बालभारती तर्फे प्रकाशित होणाऱ्या किशोर मासिकात डिसेंबर २०२३ च्या अंकात धाडसी रोहन वर कथा प्रकाशित केली होती.

# शाळांना निधी नाही मात्र अधिकाऱ्यांसाठी लाखोंची उधळपट्टी

## निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूलभूत सुविधांसाठी निधी देताना हात आखडता घेणारे जिल्हा प्रशासन मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासस्थान व कार्यालयांच्या दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करत असल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज सोमवार दि. २९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.




यावेळी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड सुनेत्राताई पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जिल्हा शल्य चिकित्सक तसेच कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासस्थान व कार्यालयांच्या गेल्या २० वर्षातील दुरुस्ती कामांचे ऑडिट करण्याची मागणी करण्यात आली आहे.पोलिस अधीक्षक बीड यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीवर दीड वर्षात तब्बल ९३ लाख रुपयांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आल्याचा आरोप करत, या प्रकरणात अंदाजपत्रके तयार करणाऱ्या व मंजुरी देणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. पोलिस अधीक्षक निवासस्थानातील दुरुस्ती कामांमध्ये उद्यान दुरुस्ती, बाहेरील रंगकाम, गेस्ट रूम व मास्टर बेडरूम फर्निचर, गार्ड रूम दुरुस्ती, स्टाफ शौचालय, चेंबर दुरुस्ती, पाइपलाइन, किचन ड्रेनेज व वॉटरप्रूफिंग, बेडरूम-गेस्ट रूम-डायनिंग हॉल सुशोभीकरण तसेच पेव्हर ब्लॉक आदी कामांचा समावेश असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शाळांची अवस्था गंभीर असून इमारत नसलेल्या ५८ शाळा, मोडकळीस आलेल्या १७४ शाळांमधील ३१३ वर्गखोल्या, विद्यार्थी संख्या वाढल्याने आवश्यक असलेल्या ७० शाळांमधील ९८ अतिरिक्त वर्गखोल्या यासाठी ५७ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. तसेच २९० वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी १२ कोटी ५० लाख रुपयांची गरज असताना प्रशासनाकडून निधी देण्यात विलंब केला जात असल्याचा आरोप करण्यात आला. शाळांसाठी निधी मिळवण्यासाठी सातत्याने आंदोलन व पाठपुरावा केल्यानंतर २८ कोटी रुपयांचा निधी मंजूर होतो, मात्र दुसरीकडे अधिकाऱ्यांच्या निवासस्थान व कार्यालयांसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो, ही बाब दुर्दैवी असल्याचे डॉ. गणेश ढवळे यांनी म्हटले. या आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,शेख मुबीन, शेख मुस्ताक,माजी सैनिक अशोक येडे, सय्यद सादेक,, प्राचार्य डी. जी. तांदळे (मार्गदर्शक मराठवाडा शिक्षक संघ), बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे, शिवाजी मांडवे आदी सहभागी झाले होते.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त धारूर येथे जि. प. माध्यमीक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

धारूर येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बालासाहेब जाधव उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले. शिक्षण हा समाजपरिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग असून, विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आत्मविश्वास आणि प्रेरणा निर्माण होत असल्याचेही सांगण्यात आले.



कार्यक्रमास पोलीस निरीक्षक राजेंद्र घुगे, पत्रकार अनिल महाजन, ॲड. मोहन भोसले, नगरसेवक बिभीषण गायकवाड, गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय कोकणे, युवा नेते मिथुन गायसमुद्रे, पत्रकार राजाभाऊ मोरे, उत्सव समितीचे संस्थापक बंडोबा सावंत, शरद सावंत, पत्रकार बलभीम मुंडे, शाळेचे मुख्याध्यापक रमेश रुद्रे, केंद्रप्रमुख हनुमंत मंत्रे तसेच शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक शंकर इंगळे यांनी केले. प्रास्ताविक केंद्रप्रमुख हनुमंत मंत्रे यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक रमेश रुद्रे यांनी केले.यावेळी नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, पत्रकार अनिल महाजन आणि ॲड. मोहन भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शिक्षण, सामाजिक समता आणि सर्वसमावेशक विकासाच्या विचारांचा आदर्श अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यांच्या सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

## पान ६ वरून...

### चहा विकणारे धनराज दिवटे

दिवटे यांनी चहा विकून आपल्या मुलीला शिकवले तिनेही आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून जिद्द,मेहनत,चिकाटीने अभ्यास करून सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी यशस्वीरित्या पूर्ण केली इतर विद्यार्थ्यांसाठी तिने आदर्श निर्माण केला आहे. आपले मनोगत व्यक्त करताना ती म्हणाली की,सिव्हिल इंजिनिअरिंग ही पदवी पूर्ण करून नामांकित नीलसॉफ्ट या राष्ट्रीय कंपनीमध्ये माझी निवड झाली आहे तुम्ही ही आपलं शिक्षण पूर्ण करताना गुरुजनांच्या मार्गदर्शन घ्या खूप अभ्यास करा तुम्ही सुद्धा तुमच्या जीवनामध्ये यशस्वी होताल. याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चाकरवाडी येथे माऊली

भाषाप्रभू श्री ह.भ. प. जगन्नाथ महाराज पाटील श्री संत नामदेव महाराज कीर्तन विद्यालय मुंबई यांच्या रसाळ वाणीतून सात दिवस श्रीमद् ? भागवत कथा श्रवण करून भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले. दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे चाकरवाडीला पंढरीचे स्वरूप आले होते लाखो भाविकांच्या उपस्थिती पार पडत असलेल्या सोहळ्यास राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित असतात. बीड जिल्ह्यातील सर्वसमावेशक असे चाकरवाडी क्षेत्रातून माऊली दादांच्या पदस्पर्शाने पावन झालेले या भूमीत संत महंतासह राजकीय पुढाऱ्यांची ही उपस्थिती असते.

### हरित क्रांतीनंतर आता

आहे. शेतीला जोडधंदा म्हणून दूध व्यवसाय उभा राहिल्यास शेतकऱ्यांच्या हातात दररोज रोख उत्पन्न येईल, कुटुंबाची आर्थिक घडी मजबूत होईल आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

आष्टीत तज्ज्ञांचे मार्गदर्शन शिबिर

आष्टी तालुका दूध संघाच्या माध्यमातून राज्य व देशातील नामांकित दुग्धतज्ज्ञ, प्रगतिशील शेतकरी आणि अनुभवी दूध उद्योजकांना आष्टी येथे आमंत्रित करण्यात आले आहे. या मार्गदर्शन शिबिरात आधुनिक दुग्धव्यवसाय, उच्च दूध उत्पादन देणाऱ्या गाईंचे संगोपन, पशुपालनातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, मुरघास निर्मिती, संतुलित पशुखाद्य, रोग व्यवस्थापन, बाजारपेठेतील संधी आणि दुग्ध व्यवसायातील आधुनिक व्यवस्थापन याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जलक्रांती ते धवलक्रांती विकासाचा नवा मंत्र

जलसंधारणातून शेतीला बळ, सिंचनातून हरित क्रांती आणि दुग्धव्यवसायातून शेतकऱ्यांच्या हातात नियमित उत्पन्न देण्याचा जलक्रांती ते धवलक्रांती हा विकासाचा नवा आराखडा प्रत्यक्षात आणण्यासाठी आमदार सुरेश धस प्रयत्नशील असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट होत आहे.आष्टी मतदारसंघाची ओळख आता केवळ दुष्काळी तालुका म्हणून नव्हे, तर जलसंपन्न, कृषिसंपन्न आणि दुग्धसमृद्ध मतदारसंघ म्हणून निर्माण करण्याच्या दिशेने सुरू असलेली ही वाटचाल भविष्यात राज्यासाठीही आदर्श ठरू शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### शिला सोनवणे यांचा

मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिरूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे यांची उपस्थिती लाभणार आहे. त्याचबरोबर प्रमुख अतिथी म्हणून भगवानराव सोनवणे ( प्राथमिक शिक्षणाधिकारी जि.प.बीड ) अनिरुद्ध सानप ( गट विकास अधिकारी गेवराई) सुरेश घोळवे (तहसीलदार शिरूर कासार ) भरत नागरे (गटविकास अधिकारी शिरूर कासार ) आदी शिक्षण क्षेत्रातील व त्याचबरोबर तालुक्यातील संख्येने रा सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची ही उपस्थिती लाभणार आहे. तरी या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील पालकांनी उपस्थित राहून सन्मान वाढवावा असे आवाहन फुलसांगवी शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीसह मुख्याध्यापक शिवाजी जाधव, ग्रामपंचायत च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### बीड जिल्ह्यात नागझरी

तलाठी यांना उपस्थित राहण्यासाठी आदेशित करण्यात आले होते. या बैठकीला ग्रामस्थ उपस्थित राहिले मात्र माजलगाव नायब तहसीलदार आणि पेशकाराशिवाय या बैठकीला एकही अधिकारी उपस्थित राहिला नाही. ज्यांनी हे पत्र काढले होते ते माजलगावचे उपविभागीय अधिकारीही या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. यावरून या प्रश्नाचे अधिकाऱ्यांना किती गांभीर्य आहे हे स्पष्ट होते. या संदर्भात ग्रामस्थांनी पुनर्वसन विभागाचे सह आयुक्त राजेश काटकर यांच्याशी संपर्क साधला मात्र तेही असे ठोस उत्तर देत नाहीत. विशेष म्हणजे विभागीय कार्यालयात नागझरी गायमुख या गावाची पुनर्वसन झाल्याची नोंदच नाही. त्यामुळे या गावाचे जिल्ह्यात अस्तित्वच नाही. धारूर तालुक्यामध्ये दिनांक २/ ९/ २०२२ रोजी एक पत्र देण्यात आले त्यावेळी मनुष्य वस्ती नसलेले गाव असा याचा उल्लेख करण्यात आला. अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्याने या गावच्या पुनर्वसनासंदर्भात अनेक अडचणी आहेत. मध्यंतरीच्या काळात जनगणना झाली. या जनगणनेत कुटुंब देवखेडा या गावचे असल्याची नोंद करण्यात आली. मात्र ही नोंद देवखेडा ग्रामस्थ म्हणून करण्यात आली आहे.याच वेळी देवखेडा ग्रामपंचायत च्या वतीने आमचा आणि या लोकांचा काहीही संबंध नाही असे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कुठलाही ठोस निर्णय घेत नाहीत. त्यामुळे या गावचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. या भागातील लोकप्रतिनिधी ही याकडे दुर्लक्ष करतात हे अनेक वेळा स्पष्ट झाले आहे. मात्र ग्रामस्थ हा लढा नेटाने आजही लढताना दिसत आहेत. त्यांना न्याय कधी मिळणार हा मोठा प्रश्न आहे.




परळी : रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद परळी वैजनाथ यांच्या अधिनस्त कंत्राटी कामगारांना मुलभूत अधिकार व हक्क मिळवून देण्यासाठी नगर परिषद परळी वैजनाथ कार्यालय समोर दिनांक: २९ जून २०२६ पासून संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष तथा कामगार प्रतिनिधी भाई राजेश कुमार जोगदंड यांचे अन्नत्याग उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे.

# अमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न

बीड । प्रतिनिधी

आज सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय बीड,समाज कल्याण कार्यालय जिल्हा परिषद बीड व नशाबंदी मंडळ बीड राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान वासनवाडी ताजी बीड ययांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सर्वप्रथम राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले तदनंतर प्रमुख पाहुण्यांनी शाहू महाराज यांच्या कार्याविषयी उपस्थित विद्यार्थी व नागरिक यांना सविस्तर माहिती दिली

त्यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये श्री उमेश सोनवणे, उपयुक्त जात पाडताळणी बीड

श्री उमेश देशपांडे, विशेष अधिकारी समाज कल्याण बीड , श्रीमती श्रावस्ती मेश्राम , प्र जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद बीड तथा संशोधन अधिकारी जातपडताळणी बीड

तत्त्वशील कांबळे जिल्हा संघटक नशाबंदी मंडळ बीड

श्री विनोद वराट, गृहपाल श्री पी डी उगले, वरिष्ठ लिपिक श्रीमती अंजली मोरे कनिष्ठ लिपिक आदि कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी तत्त्वशील कांबळे यांनी सर्वांना नशा मुक्ती भारत योजनेअंतर्गत व्यसनमुक्ती ची शपथ घेण्यात आली.

# त्याग आणि समर्पणावर भाशिप्र संस्था राष्ट्र निर्माणाच्या कार्यासाठी उभारली गेली-खुर्पे

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा ७५ वा वर्धापनदिन येथील श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलात मोठ्या उत्साहात संपन्न. संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर स्वामी विवेकानंद वाचनालयाचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, भारत माता व सरस्वती मातेचे पूजन करून झाले. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, संस्थेचे सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका संघचालक जगदीश साखरे, शहर कार्यवाह संजय जवळेकर, श्री सिध्देश्वर सिध्देश्वर' संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी 'प्रवास संस्थेच्या पाऊण शतकांचा' या विषयावर व्याख्यान देताना संस्थेचे सहकार्यवाह अमरनाथ खुर्पे यांनी सांगितले की, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही प्रतिकुल परिस्थितीत त्याग आणि समर्पणावर राष्ट्र निर्माणाच्या कार्यासाठी उभारली गेली आहे. या संस्थेत सातत्याने शिक्षणाबरोबरच संस्कार आणि विचार देण्याचे कार्य केले जाते. विश्वास, निष्ठा, राष्ट्रभक्ती, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचाराचा वसा घेऊन उभारलेल्या या संस्थेतील विद्यार्थी आज देशाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावत आहे ही या संस्थेची खरी उपलब्धी आहे 'इवलेसे रोप लावियेले द्वारी त्याचा वेलु गेला गगनावरी' या उक्ती प्रमाणे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने भौतिक, भौगोलिक तसेच गुणात्मक उंची शिक्षकांच्या त्यागावर निर्माण केली आहे. यावेळी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षे व श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त मान्यवरांच्या हस्ते प्रतिक चिन्हाचे विमोचन करण्यात आले. तसेच श्री सिध्देश्वर महाविद्यालयाच्या वतीने प्रतिवर्षी दिला जाणारा प्रेरणा पुरस्कार यावर्षी नवनाथ नेतके यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच विचार बोध या अंकाचे विमोचन करण्यात आले.




या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर यांनी सांगितले की, ही संस्था व्यक्ती निष्ठनसून विचार निष्ठ आहे. प्रास्ताविक श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह अड विश्वास जोशी यांनी केले. आभार श्रीमती सत्यभामा मोरे यांनी मानले तर सुत्रसंचालन प्रा डॉ रमेश गटकळ यांनी केले. यावेळी महाविद्यालय समितीने अध्यक्ष अभय कोकड, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने, सीबीएसई चे अध्यक्ष तेजस महाजन, शिशुविहार चे अध्यक्ष लक्ष्मीकांत जोशी, जेष्ठ सभासद भिकचंदजी दुगड, सर्व स्थानिक संस्था सभासद, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक धनंजय गिराम, सीबीएसई च्या प्राचार्या श्रीमती सिंपल शर्मा, शिशुविहार च्या वर्षा कुलकर्णी, सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६८८**
**दिनांक - २९/०६/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती नय्युम फकीर पठाण रा. नागझरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत:च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नय्युम फकीर पठाण | स्वत: | ०७/१०/१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/०६/२०२६-रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# शेतकऱ्यांकडून थेट दूधविक्रीला मिळतोय वाढीव दर

## दूध भेसळीविरोधातील कारवाईचा परिणाम

अहिल्यानगर : अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात दूध भेसळीविरोधात कारवाईला सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून थेट ग्राहकांना विक्री केल्या जाणाऱ्या गाई-म्हशींच्या दुधाला मागणी वाढली आहे. प्रति लिटरमागे १० ते १५ रुपये दरवाढ मिळू लागली आहे. पनीर, दही, ताक, तूप, खवा यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांचे दरही वाढले आहेत. भेसळीच्या कारवाईमुळे दुधाला चांगला दर मिळण्याच्या शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.



राज्यात गाईंच्या सव्वादोन ते अडीच लाख लिटर दुधाचे संकलन होते. त्यातील ४० टक्के दुधावर प्रक्रिया केली जाते, तर उर्वरित दूध बंद पिशव्यांमधून ग्राहकांना विकले जाते. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारताच दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळीविरोधात मोहीम उघडली. तेव्हापासून दुधाच्या संकलनात तसेच पनीर, दही, ताक, तूप, खवा यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनातही घट झाल्याचे बाजारातील स्थितीवरून दिसून येत आहे. राज्यात म्हशीच्या दुधाचे सुमारे २५ लाख लिटर उत्पादन होते. यातील ९० टक्के दूध शेतकरी थेट ग्राहकांना रतीबाद्वारे विकतात. अहिल्यानगर शहरानजीक असलेल्या अहिल्यानगर, पारनेर, राहुरी, पाथर्डी आणि कर्जत तालुक्यांतील अनेक शेतकरी आसपासच्या शहरांमध्ये म्हशीचे व गाईचे दूध विकतात. गेल्या महिनाभरापासून या दुधाला मागणी वाढली आहे. त्यामुळे पूर्वी म्हशीच्या दुधाला ७० ते ८० रुपये प्रति लिटर दर मिळत होता, तो आता ९० ते १०० रुपयांवर पोहोचला आहे. गाईच्या दुधालाही पूर्वी ३५ ते ४० रुपये प्रति लिटर दर मिळत होता.

तो आता ५० ते ६० रुपये प्रति लिटर झाला आहे.अहिल्यानगर जिल्ह्यात रसायनाचा वापर करून बनावट दुधापासून पनीर व खवा तयार केला जात असल्याचे प्रकार उघड झाले होते. मात्र त्यावर फारशी कारवाई झाली नव्हती.

हॉटेलांमध्ये राजरोसपणे बनावट पनीर वापरले जात असल्याचे दिसूनही दुर्लक्ष केले जात असल्याने श्रीगोंद्याचे आमदार विक्रम पाचपुते यांनी मागील वर्षी या बाबत विधानसभेत आवाज उठवला होता.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८५९ : चार्ल्स ब्लांडिन यांनी नायगारा धबधबा एकादोरीबारून कसरत करीत पार केला.
१९३७ : जगातील पहिला तत्काळ दूरध्वनी क्रमांक ९९९ लंडनमध्ये सुरु करण्यात आला.
१९४४ : मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमात 'प्रभात'चा 'रामशास्त्री' हा चित्रपट रिलीज झाला. या चित्रपटात ललिता पवार या अभिनेत्रीवर खलनायिकेचा कायमचा शिक्का बसला.
१९६० : काँगोला (बेल्जियमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९६५ : भारत व पाकिस्तानमध्ये कच्छचा करार झाला.
१९६६ : कोका सुब्बा राव यांनी भारताचे ९ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९६६ : अमेरिकेची सर्वात मोठी स्त्रीवादी संस्था नॅशनल ऑरगनायझेशन फॉर वुमन ची स्थापना झाली.
१९७१ : सोयुझ-११ या रशियन अंतराळयानात बिघाड होऊन तीन अवकाशवीर ठार झाले.
१९७८ : अमेरिकेच्या संविधानात २६ वा बदल संमत झाला त्यामुळे मतदानाचे वय १८ वर्षे झाले.
१९८६ : केन्द्र सरकार व मिझो नॅशनल फ्रंट यांच्यात करार होऊन मिझोरामला राज्याचा दर्जा देण्याचे ठरले.
१९९७ : ब्रिटनने चीनकडुन ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्याने घेतलेल्या हाँगकाँग बेटांच्या भाडेपट्ट्याची मुदत संपल्याने ब्रिटनने हे बेट समारंभपूर्वक चीनला परत दिले.
२००० : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बील क्लिंटन यांनी अमेरिकेत डीजीटल हस्ताक्षर करण्यास वैध रित्या परवानगी दिली.
२००२ : ब्राझीलने फुटबॉल विश्वकप जिंकला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७० : चार्ल्स (आठवा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ७ एप्रिल १४९८)
१९०३ : भारतीय राजकारणी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस राजकीय पक्षाचे सदस्य मुकुट बिहारी लाल भार्गव यांचा जन्मदिन.
१९११ : साहित्य अकादमी चे फेलोशिप प्राप्त भारतीय साहित्यकार नागार्जुन यांचा जन्मदिन.
१९१९ : हॉट एअर बलूनचे निर्माते एड यॉस्ट यांचा जन्म: (मृत्यू: २७ मे २००७)
१९२८ : कल्याणजी वीरजी शाह सुमारे तीन दशके रसिकांवर आपल्या सुरावटीची मोहिनी घालणार्या 'कल्याणजी-आनंदजी' या संगीतकार द्वयीतील ज्येष्ठ बंधू (मृत्यू: २४ ऑगस्ट २०००)
१९३४ : भारतीय रसायनशास्त्रज्ञ चिंतामणी नागेश रामचंद्र राव यांचा जन्म.
१९४३ : सईद मिर्झा दिग्दर्शक आणि पटकथालेखक
१९५४ : डॉमिनिकाचे पंतप्रधान पिएर चार्ल्स यांचा जन्म.
१९५९ : भारतीय-इंग्लिश उद्योगपती आणि राजकारणी संदीप वर्मा यांचा जन्म.
१९६६ : माईक टायसन अमेरिकन मुष्टीयोद्धा
१९६९ : सनत जयसूर्या श्रीलंकेचा क्रिकेटपटू
१९७३ : भारतीय क्रिकेट खेळाडू दोड्डा गणेश यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५७ : शाही डोगरा राजवंशाचे संस्थापक आणि जम्मू-काश्मीर राज्याचे पहिले महाराजा तसचं, ब्रिटीश भारतातील दुसर्या क्रमांकाचे सर्वात मोठे रियासतदार महाराजा गुलाबसिंह जामवाल यांचे निधन.
१९१७ : पितामह दादाभाई नौरोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक आणि राजकीय व सामाजिक नेते, ब्रिटिश संसदेचे सदस्यत्त्व मिळवणारे पहिले भारतीय (जन्म: ४ सप्टेंबर १८२५)
१९१९ : नोबल पारितोषिक विजेता ब्रिटीश भौतिकशास्त्रज्ञ जॉन विलियम्स स्ट्रट रेले यांचे निधन.
१९९२ : डॉ. वसंत कृष्ण वराडपांडे साहित्यिक, वक्ते व समीक्षक (जन्म:)
१९९४ : बाळकृष्ण हरी तथा 'बाळ' कोल्हटकर नाटककार, कवी, अभिनेते, निर्माते, लेखक व दिग्दर्शक (जन्म: २५ सप्टेंबर १९२६)
१९९७ : राजाभाऊ साठे शास्त्रोक्त व नाट्यसंगीत गायक, यांनी २५ वर्षे कै. राम मराठे यांच्याबरोबर संगीत सौभद्र नाटकात श्रीकृष्णाची भूमिका केली होती.
१९९९ : कृष्णा बळवंत तथा कृ. ब. निकुंब सहजसुंदर काव्याविष्काराचा प्रत्यय घडवणारे मराठी काव्यसृष्टीतील कवी (जन्म:)
२००७ : दिल्लीचे चौथे मुख्यमंत्री साहिबसिंह वर्मा यांचे निधन. ( जन्म: १५ मार्च १९४३)
२००८ : भारतीय पंजाब राज्यातील प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक आणि राजकारणी केवल कृष्ण यांचे निधन.

# शेतातील काँग्रेस-लव्हाळा गवताचा असा कार कायमचा बंदोबस्त!



शेतीमध्ये उत्पादन वाढवण्यासाठी सर्वात मोठा अडथळा ठरणारा घटक म्हणजे तणांचा प्रादुर्भाव. विशेषतः काँग्रेस गवत, लव्हाळा, वाघनखी, हरळी यांसारखी तणं शेतात एकदा आली की ती सहजासहजी जात नाहीत. या तणांमुळे पिकांची वाढ खुंटते, उत्पादनात घट होते आणि अनेकदा शेतकऱ्याला मजुरांचा खर्च, वेळ आणि मेहनत वाढवावी लागते. कांदा, लसूण, भाजीपाला, डाळिंब, फुलशेती अशा संवेदनशील पिकांमध्ये सुरुवातीच्या ४ ते ६ आठवड्यांत जर या तणांनी आक्रमण केले, तर उत्पादनात ४० टक्क्यांपासून ते थेट ८० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. तणं पिकांसोबत पाणी, अन्नद्रव्ये, सूर्यप्रकाश आणि जागेची स्पर्धा करतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी तण नियंत्रण ही प्रक्रिया लागवडीच्या आधीपासून आखून करणे आवश्यक ठरते.

तण नियंत्रणाची सुरुवात योग्य मशागतीपासून होते. शेतीची खोल नांगरणी, त्यानंतर दोन वेळा कुळवणी केल्यास मातीतील तण बीज सूर्यप्रकाशाने नष्ट होतात. काही शेतकरी मशागतीनंतर जमिनीत प्लास्टिक मल्चिंगचा वापर करतात, ज्यामुळे जमिनीवर सूर्यप्रकाश न पडल्यामुळे तणांची उगमक्षमता रोखली जाते. याशिवाय सेंद्रिय मल्च म्हणजेच ऊसाचे पाचट, गवत, पेंढा यांचा थर पिकांभोवती पसरवल्यासही तणं उगवत नाहीत आणि मातीतील ओलावा टिकून राहतो.

ही नैसर्गिक पद्धत असल्यामुळे जमिनीचे आरोग्यही चांगले राहते. तण नियंत्रणासाठी खुरपणी ही पारंपरिक पद्धत असून ती अतिशय प्रभावी आहे. हाताने किंवा यंत्राच्या साहाय्याने तणं मुळासकट काढून टाकल्यास पुढील काही आठवडे पुन्हा तण वाढत नाहीत. मात्र ही प्रक्रिया मजुरांवर अवलंबून असल्याने खर्चिक ठरते, विशेषतः मोठ्या क्षेत्रात. यासाठी रासायनिक तणनाशके वापरणे हा पर्याय अनेक शेतकरी निवडतात. पेरणीनंतर लगेच, म्हणजेच २४ ते ४८ तासांच्या आत ''पूर्व उगम तणनाशक'' वापरले, तर ते जमिनीतून उगम होणाऱ्या तणांना नष्ट करते. यामध्ये पेंडीमेथालिन ३०% ईसी (३ मि.ली./लिटर) आणि ऑक्सिफ्लुरोफेन २३.५% ईसी (१ मि.ली./लिटर) हे प्रभावी ठरतात. तणं उगवल्यानंतर जर नियंत्रण करायचं असेल, तर क्लोडिनाफॉप-प्रोपार्गिल, प्रोपॅक्विझाफॉप किंवा क्विझालोफॉप इथाइल यांसारखी निवडक तणनाशके वापरली जातात. फवारणी करताना त्यात सिलिकॉन स्टिकर मिसळल्यास औषध झाडावर चांगल्या प्रकारे पसरते, त्यामुळे परिणामकारकता वाढते.

रासायनिक तणनाशकांचा पिकाच्या मुळांवर दुष्परिणाम होऊ नये म्हणून फवारणीनंतर काही दिवसांनी चिलेटेड झिंक वापरणे फायदेशीर ठरते. तणनाशकांमुळे पिकांच्या मुळांची वाढ थांबू नये, म्हणून अशा पूरक अन्नद्रव्यांचा वापर आवश्यक आहे. नर्सरी अवस्थेत, म्हणजेच बी टाकल्यानंतर १-२ दिवसात फवारणी केली, तर तण उगवण्यापूर्वीच नष्ट होतात. पुनर्लागवडीनंतर ४५-५० दिवसांनी दुसरी फवारणी किंवा खुरपणी करून तण नियंत्रण अधिक परिणामकारक करता येते.

# या आहेत शेळ्यांच्या तीन विशेष प्रजाती

## शेळीपालनासाठी केंद्र सरकारची शिफारस!

राज्यात शेतीला जोडधंदा म्हणून शेळीपालन व्यवसाय झपाट्याने वाढत आहे. विशेष म्हणजे शेळीपालन करण्यासाठी शेतकऱ्यांना भांडवल उपलब्ध व्हावे. यासाठी शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारकडून विविध योजना राबविल्या जात आहे. इतकेच नाही तर शेतकऱ्यांना राष्ट्रीय ग्रामीण विकास बँकेकडून (नाबार्ड) कर्ज स्वरूपात आर्थिक मदत देखील उपलब्ध करून दिली जात आहे. इतकेच नाही तर केंद्रीय पशुसंवर्धन आणि दुधव्यवसाय मंत्रालयाकडून देखील शेळीपालन व्यवसायाला विशेष प्रोत्साहन दिले जाते.

मांस उत्पादनासाठी प्रसिद्ध :अलीकडेच केंद्र सरकारकडून देशातील तीन विशेष प्रजातींच्या शेळ्यांबद्दल माहिती जारी करण्यात आली आहे. यामध्ये सिरोही, उस्मानाबादी आणि संगमनेरी या प्रजातीच्या शेळ्यांबद्दल माहिती देण्यात आली आहे. शेळीपालन तज्ज्ञांच्या मते, देशातील या तीनही शेळ्यांच्या प्रजाती मांस उत्पादनासाठी पाळल्या जातात. यातील सिरोही ही शेळी मूळची राजस्थानची प्रजाती आहे. तर उस्मानाबादी आणि संगमनेरी या प्रजातीच्या शेळ्या महाराष्ट्रात आढळतात. विशेष म्हणजे या तिन्ही प्रजातीच्या शेळ्यांच्या मांसाला मोठी मागणी आहे. प्रामुख्याने पश्चिम बंगालमध्ये दुर्गा पूजेच्या वेळी या शेळ्यांच्या मांसाला खूप मागणी असते.

सिरोही शेळी :सिरोही प्रजातीच्या शेळ्यांचा रंग तपकिरी आणि पांढऱ्या रंगाचे मिश्रण असते. या शेळ्यांच्या अंगावरील केस दाट व लहान असतात. शेळी आणि बोकड या दोघांची शरीरे मध्यम आकाराची असतात. या प्रजातीच्या शेळीचे शेपूट वक्र असून, अंगावर दाट केस असतात. तसेच या शेळीचे शिंगे लहान व तीक्ष्ण आणि मागे वळलेली असतात. या शेळीच्या बोकडाचे सरासरी वजन ५० किलो असते आणि शेळीचे वजन २३ किलो असते. जन्माच्या वेळी लहान बकराचे सरासरी वजन दोन किलोग्रॅमपर्यंत असते. या जातीच्या शेळ्या वर्षातून एकदा दोन पिल्लांना जन्म देतात.

उस्मानाबादी शेळी :उस्मानाबादी जातीची शेळी ही प्रामुख्याने महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यासह लातूर, तुळजापूर आणि उदगीर भागात आढळते. या प्रजातीच्या शेळ्या आकाराने मोठ्या असतात. या जातीच्या शेळ्या ७३ टक्केपर्यंत पूर्णपणे काळ्या रंगाच्या असतात. तर २७ टक्के पांढरे आणि तपकिरी रंगाचे डाग असतात. उस्मानाबादी शेळी ही दूध आणि मांस दोन्हीच्या उत्पादनासाठी पाळली जाते. या जातीच्या शेळीचा दूध देण्याचा कालावधी चार महिन्यांचा असतो. या जातीच्या शेळ्या दररोज अर्धा ते दीड लिटरपर्यंत दूध देतात. या प्रजातीची शेळी वर्षातून दोनदा दोन पिलांना जन्म देते. या जातीच्या एका शेळीपासून ४५ ते ५० किलोपर्यंत मांस मिळते.

संगमनेरी शेळी : शेळीची ही संगमनेरी जात साधारणपणे महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये आढळते. या जातीच्या शेळ्या या मध्यम आकाराच्या असतात. संगमनेरी शेळ्यांचा रंग एकसारखा नसतो; पांढऱ्या, काळ्या किंवा तपकिरी व्यतिरिक्त, इतर रंगांचे डाग देखील आढळतात. या जातीच्या शेळयांचे कान खालीच्या बाजूने वाकलेले आहेत. या जातीच्या शेळी आणि बोकडांची दोन्ही शिंगे मागच्या बाजूला झुकलेली असतात. संगमनेरी जातीची शेळी दिवसाला अर्धा ते एक लिटर दूध देते. ते आपल्या प्रजनन काळात एकूण १६५ दिवस दूध देते.



# मका पिकावरील अमेरिकन लष्कर आळीवर उपाययोजना

मकावर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी मोठी चिंता बनली आहे. विशेषतः मराठवाड्यात मका हे पीक पावसावर आधारित असल्याने आणि उत्पादन खर्च तुलनेने कमी असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी कपाशीऐवजी मका घेतले. मात्र, अलीकडेच छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील मका शेतात या धोकादायक अळीचा प्रादुर्भाव आढळून आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ही अळी मका पिकासाठी अतिशय घातक असून, ती लहान अवस्थेतील मका झपाट्याने नष्ट करू शकते.

ही अळी पानांच्या मध्यवर्ती भागातून सुरुवात करून संपूर्ण झाडाचा फडशा पाडते. तिच्या हल्ल्यामुळे झाडांचे मुख्य शेंडे खाल्ले जातात, ज्यामुळे झाडाची वाढ थांबते आणि धारण केलेले पाणी व अन्नद्रव्यांचा वापर निष्फळ ठरतो. ही अळी लपून राहण्याची क्षमता असलेली असल्यामुळे ती लवकर लक्षात येत नाही आणि एकदा वाढ झाली की मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. विशेष म्हणजे, ही अळी गरम आणि आर्द्र हवामानात अधिक वेगाने फोफावते. त्यामुळे पावसाळ्याच्या सुरुवातीला तिचा प्रादुर्भाव अधिक गंभीर असतो. सध्या मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांत मका पिकाची पेरणी मोठ्या प्रमाणात झाली आहे. विशेषतः छत्रपती संभाजीनगरमध्ये सुमारे १.८५ लाख हेक्टर क्षेत्रावर मका लागवड झाली आहे, तर जालना, बीड, धाराशिव आदी जिल्ह्यांतही हे क्षेत्र लक्षणीय आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव संपूर्ण मका पट्ट्यात पसरू शकतो. अळीच्या प्रादुर्भावामुळे मका उत्पादनात ३० ते ६० टक्केपर्यंत घट येण्याचा धोका असतो, जो शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी अत्यंत घातक आहे. या संकटावर नियंत्रण मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी काही उपाय तत्काळ राबवणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, पेरणीनंतर १० ते २५ दिवसांदरम्यान नियमितपणे मका शेताची पाहणी करावी. अळी आढळल्यास ती वेचून नष्ट करावी. लहान व कोवळ्या अवस्थेतील झाडांवर अळी लपून बसते, म्हणून शेंडे भागात विशेष लक्ष द्यावे. जैविक उपाय म्हणून ट्रायकोग्रामा प्रीटिओसम या परजीवी कीटकाचे सोडणे फायदेशीर ठरते. याशिवाय जैविक कीटकनाशकांचा वापर करावा. रासायनिक उपायांमध्ये, एमामेक्टिन बेन्झोएट ५% एसजी (५ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी), स्पायनेटोराम ११.७% एससी (८० मिली प्रति १० लिटर पाणी) यासारख्या कीटकनाशकांचा वापर प्रभावी ठरतो. फवारणी करताना सकाळी किंवा संध्याकाळी करावी, जेणेकरून फवारणीचा परिणाम जास्त होतो. फेरोमोन सापळे लावल्यास अळीच्या प्रादुर्भावावर लक्ष ठेवता येते. या अळीचा प्रसार थांबवण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन तंत्र वापरणे अत्यावश्यक आहे. यात शेतातील विविध जैविक, यांत्रिक व रासायनिक उपाय एकत्र करून वापर केल्यास लष्करी अळीचा प्रादुर्भाव रोखता येतो. या संकटावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळ वाया न घालवता वैज्ञानिक सल्ल्याचा अवलंब करावा आणि पीक वाचवण्यासाठी त्वरित कृती करावी.



मंगळवार दि.३० जून २०२६ ५

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

# शिवसेना संपविण्याची सुपारी संजय राऊतांनी घेतली -खा.जाधव

## शेतकरी व शिवसैनिकांसाठी अहोरात्र काम करणारा कार्यकर्ता बोराडे-आनंदराव जाधव

मंठा। प्रतिनिधी

बेताल बडबड करून संजय राऊतांनी शिवसेना संपवायचे काम केले असून शिवसेना संपविण्याची सुपारीच त्यांनी घेतली असा घणाघात खा. संजय जाधव यांनी केला, परभणी लोकसभा मतदार संघातून २०२४ ची निवडणूक मशालीवर लढलो असलो तरी आपला जन्म धनुष्यबाणात झालाय आणि शेवट धनुष्यबाणातच होणार अशी ग्वाही त्यांनी दिली. मंठा येथे रविवार ता. २८ रोजी गजानन मंगल कार्यालयात मंठा - परतूर - नेर-सेवली मतदारसंघातील शिवसेना संवाद बैठकीत खा. जाधव बोलत होते. या बैठकीला परभणी लोकसभा मतदारसंघाचे संपर्कप्रमुख तथा शिवसेना उपनेते आनंदराव जाधव, शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे, प्रल्हादराव बोराडे, संतोष वरकड, किसनराव मोरे, तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, सुदर्शन सोळंके, अरुण उफाड, धनंजय पोहेकर, योगेश पाटील अवचार, तुळशीराम कोहिरे, अशोक भागडे,




योगेश गणगे, सुनिता देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना खा. जाधव म्हणाले की, परतुर विधानसभा मतदारसंघाने मला वेळोवेळी प्रचंड सहकार्य केले मी त्यांचे ऋण कधीच विसरू शकत नाही. हा मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि बालेकिल्लाच राहणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यशवाडी येथील दुर्घटनेमुळे खा. जाधव यांनी सत्कार स्वीकारला नाही. याप्रसंगी परभणी लोकसभा मतदारसंघातील संपर्कप्रमुख आनंदराव जाधव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शिवसेनेच्या सर्व बीएलए यांनी एसआयआर प्रक्रियेसाठी दक्ष राहिले तरच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसेनेला भरघोस यश मिळेल अशी खात्री दिली. जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे सर्वसामान्यांसाठी रात्रंदिवस काम करणारा कार्यकर्ता आहे, अल्पमतांनी पराभव झाला असला तरी उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व शिवसेना नेते खा. डॉ. श्रीकांत शिंदे आगामी काळात त्यांना ताकद देतील असे सांगितले.

शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे यांनी आपल्या प्रास्तविक पर भाषणात सांगितले की, परतुर विधानसभा मतदारसंघातील जनतेला एका एका मताची किंमत नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत कळाली असल्यामुळे सर्व बीएलए जोमाने कामाला लागलेले आहेत. एसआयआर प्रक्रियेवर आपले बारकाईने लक्ष असून या प्रक्रियेत निष्काळजीपणा होता कामा नये अशी सूचना त्यांनी केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी पदाधिकाऱ्यांना एसआयआर प्रक्रियेबद्दल व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे शेखर परदेशी यांनी प्रशिक्षण दिले. स्क्रीनवर सर्वांशी संवाद साधत त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. या शिवसेना संवाद बैठकीला प्रल्हादराव खेडेकर, श्रीरंगराव खरात, केशव महाराज सरकटे, मधुकर काकडे, बाबाराव राठोड, संजय राठोड, वसंतराव राऊत, नगरसेवक अचित बोराडे, रामराव वरकड, कासाबाई शिरोळे, ॲड. राजेश खरात, भगवान गायकवाड, अक्षयदीप वाघमारे, पांडू बोराडे, रामेश्वर शिंदे, विष्णुपंत खराबे, बंडू मोरे, डॉ. संतोष पवार, पांडू वैद्य, नितीन मोरे, विजय बागल, विकी गिराम, डॉ. उद्धव उबाळे, प्रदीप ठोके, रामजी खवल, अशोक घारे, शरद भारूका यांच्यासह प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते सर्व बीएलए यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेना संघटक पप्पू दायमा यांनी केले. यावेळी शेकडो युवकांनी शिवसेनेत प्रवेश केला.

---


## कारवाईच्या धास्तीने जामखेडात दुग्धजन्य पावडरच्या ५० गोण्या वनक्षेत्रात फेकल्या

जामखेड। प्रतिनिधी

राज्यात अन्न व औषध प्रशासनाकडून अन्नभेसळीविरोधात सुरू असलेल्या कठोर कारवाईमुळे भेसळखोरांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जामखेड तालुक्यातील दिघोळतेलंगशी रस्त्यालगत वन विभागाच्या हद्दीत अज्ञात व्यक्तींनी दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पावडरसदृश पदार्थांच्या तब्बल ५० ते ६० गोण्या बेवारस अवस्थेत टाकून दिल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून शेतकरी, पशुपालक आणि ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

२६ जून रोजी परिसरातील एका शेतकऱ्याच्या निदर्शनास वन विभागाच्या जागेत मोठ्या प्रमाणात पावडरने भरलेल्या गोण्या आल्या. संबंधित शेतकऱ्याने तातडीने दिघोळचे सरपंच दशरथ राजगुरू यांना याची माहिती दिली. त्यानंतर सरपंच राजगुरू यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. गोण्यांचा एवढा मोठा साठा रात्रीच्या वेळी अज्ञात व्यक्तींनी येथे आणून टाकल्याचा प्राथमिक अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. घटनेची गंभीर दखल घेत सरपंच दशरथ राजगुरू यांनी तात्काळ खर्डा पोलीस ठाणे तसेच वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर खर्डा पोलीस आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या संपूर्ण प्रकरणाची वन विभाग, अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांनी तातडीने सखोल चौकशी करून संबंधित पदार्थाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत, तसेच हा साठा येथे टाकणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. सध्या या सर्व गोण्या घटनास्थळीच पडून असून, त्यामुळे पर्यावरण, वन्यजीव आणि जनावरांच्या आरोग्याला संभाव्य धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने या साठ्याची योग्य विल्हेवाट लावून संपूर्ण प्रकरणाचा छडा लावावा,

दिघोळ-तेलंगशी रस्त्यावरील प्रकार



अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे. राज्यात सध्या अन्न व औषध प्रशासनामार्फत भेसळीविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू आहे. आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मोहिमेमुळे भेसळखोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कारवाईच्या धास्तीनेच हा दुग्धजन्य साठा वनक्षेत्रात टाकून दिला असावा, अशी चर्चा परिसरात रंगली आहे. मात्र, या दाव्याला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नसून तपासानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. जामखेड तालुक्यातील दिघोळतेलंगशी रस्त्यालगत दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पावडरसदृश पदार्थाच्या फेकलेल्या गोण्या. दूध संकलन केंद्रांशी संबंध? विशेष म्हणजे, या परिसरात खर्डा, तेलंगशी, दिघोळ, माळवाडी, जायभायवाडी, मोहरी आणि जातेगाव आदी गावांमध्ये अनेक दूध संकलन केंद्रे कार्यरत आहेत. त्यामुळे या बेवारस गोण्यांचा आणि दुग्ध व्यवसायाचा काही संबंध आहे का, याबाबतही विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. या गोण्यांमध्ये नेमका कोणता पदार्थ आहे, तो निकृष्ट दर्जाचा, भेसळयुक्त किंवा वापरास अयोग्य आहे का, याबाबतही शंका व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने अथवा पशुपालकाने या पावडरचा जनावरांच्या खाद्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी वापर करू नये, तसेच या पदार्थापासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पीएसआय संदीप ढाकणे याची बदली नंदुरबार जिल्ह्यात; ते पाथर्डी पोलीस ठाण्यात कसा?

### एसपी ममुका सुदर्शनजी भ्रष्ट पीएसआय संदीप ढाकणे यास पाथर्डी पोलीस ठाण्यातून तातडीने रिलीज करा!

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी पोलीस ठाण्यातील अत्यंत भ्रष्ट व सटकेल पीएसआय संदीप ढाकणे याची तातडीने अहिल्यानगर जिल्ह्याबाहेर नंदुरबार जिल्ह्यात बदली झाल्याची माहिती आहे परंतु अद्याप पर्यंत त्याला रिलीज का केले नाही हा प्रश्न आहे भ्रष्ट पीएसआय संदीप ढाकणे याला तातडीने पाथर्डी पोलीस ठाण्यातून नंदुरबार जिल्ह्यात रिलीज करण्याची मागणी पत्रकार दादासाहेब खेडकर यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस पोलीस महासंचालक मुंबई विशेष पोलीस आयुक्त परिक्षेत्र नाशिक व पोलीस अधीक्षक ममुका सुदर्शन यांच्याकडे केली आहे पीएसआय संदीप ढाकणे हा पाथर्डी पोलीस ठाण्यातील सर्वात भ्रष्ट अधिकारी

**पीएसआय संदीप ढाकणे गुन्हेगारी आणि अवैध धंदे यांचे कनेक्शन? :** पीएसआय संदीप ढाकणे याच्या जुडिशल मध्ये सर्वात जास्त विनयभंग बलात्कार अवैध धंदे बिंगो मटका जुगार चोरी दरोडे लुटमार तसेच परस्पर फिर्यादी घेऊन खोटे गुन्हे दाखल करून लाखो रुपयांची आर्थिक तडजोड करणे पाथर्डी तालुक्यातील दोन-तीन खुनाच्या गुन्ह्यात पीएसआय संदीप ढाकणे याने आरोपींना मदत करण्यासाठी लाखो रुपयांची डील केली असल्याचा आरोप देखील आहे यामुळे पीएसआय संदीप ढाकणे याची नाशिक पोलीस परिक्षेत्र महासंचालक यांच्यामार्फत खातेनिहाय चौकशी करण्यात यावी व संदीप ढाकणे याचे गुन्हेगारांचे व अवैध धंद्यावाल्यांशी थेट संबंध असल्याने याचे सीडीआर तपासण्यात यावेत व याचे बँक खाते तपासून पोलीस सेवेतील पगाराशिवाय अन्य आर्थिक व्यवहार कुठल्या मार्गाने केले याची सुद्धा सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

असून याने त्याच्या गेल्या एक ते दीड वर्षाच्या कालावधीत पाथर्डी तालुक्यातील अवैध धंद्यांना प्रोत्साहन देणे बनावट दारू बिंगो जुगार अन्य अवैध धंदे व गुन्हेगारांशी याचे आर्थिक हितसंबंध असल्याने पीएसआय संदीप ढाकणे याच्या जुडीसील मध्ये सर्वाधिक गुन्हेगारी वाढत चालल्याची आकडेवारी आहे संदीप ढाकणे पीएसआय झाल्यापासून याच्या सेवा पुस्तिकाची चौकशी करण्यात यावी सगळ्यात जास्त सामान्य नागरिकांच्या व सामाजिक कार्यकर्त्यांच्या तक्रारी पीएसआय संदीप ढाकणे याच्या विरोधात आहेत पत्रकार दादासाहेब खेडकर अमानुष मारहाण प्रकरणी अद्यापपर्यंत पीएसआय संदीप ढाकणे वर कुठलीही कारवाई झाली नसल्याने लवकरच पोलीस अधीक्षक कार्यालयसमोर आमरण उपोषण करणार असल्याची माहिती दादासाहेब खेडकर यांनी दिली आहे पीएसआय संदीप ढाकणे याची खातेनिहाय चौकशी करून त्याला पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात यावे अशी निवेदनात मागणी करण्यात आली आहे.

## जुलैमध्ये १० तारखेनंतर पावसाची विश्रांती

खामगाव। प्रतिनिधी

बंगालच्या उपसागरात व अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन तो दाब पुढे सरकण्यासाठी आणि पाऊस बरसण्यासाठी चक्राकार वारे एक जुलै नंतर सर्वदूर झपाट्याने वाहतील आणि आभाळात काळ्या ढगांची गर्दी होऊन २ ते ८ जुलै या कालावधीत महाराष्ट्रासह विदर्भात सर्वदूर समाधानकारक पाऊस बरसेल, बुलडाणा जिल्ह्यात मात्र जुलै महिन्यात १० तारखेनंतर पाऊस विश्रांती घेईल, असा अंदाज येथील हवामान अभ्यासक प्रकाश पारेख यांनी वर्तवला आहे.

यंदा अल निनो च्या प्रभावामुळे अरबी समुद्र व पश्चिम बंगालच्या उपसागरात ज्या प्रमाणात कमी दाबाचा पट्टा जूनच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात निर्माण व्हायला पाहिजे तो निर्माण झाला नाही. त्यामुळे यंदा पाऊस जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात कुठे कमी तर कुठे पाऊस बरसला नाही. असे सांगून प्रकाश पारेख म्हणाले की, आता ती परिस्थिती जून नंतर जुलै च्या प्रारंभापासून बदलेल.

ही परिस्थिती बदलल्यानंतर महाराष्ट्रात सर्वत्र आठवडाभर समाधानकारक पाऊस पडेल. हा अंदाज शेतकरी व नागरिकांसाठी खऱ्या अर्थाने आनंददायी येणार आहे. प्रकाश पारेख, हवामानतज्ज्ञ समुद्रातील पाण्याचे बाष्पीभवन होऊन भारतात काळे ढग आणण्यासाठी मेडल ज्युलियन व इंडियन ओशन डायपोल ही पाऊस बरसणारी सिस्टिम पण एक जुलै नंतर तयार होणार आहे याचाही फायदा सर्वत्र पाऊस बरसण्यावर होणार आहे.

## कौटुंबिक वादातून पत्नीला मारहाण करत मेव्हण्याची दुचाकी पेटवली

राहुरी । प्रतिनिधी

राहुरी फॅक्टरी परिसरातील प्रसाद नगर येथे कौटुंबिक वादातून पत्नीला शिवीगाळ व मारहाण करून, तिच्या भावाची दुचाकी पेट्रोल टाकून पेटवून दिल्याची घटना घडली. या प्रकरणी पीडित पत्नीच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात पतीविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेहा नवनाथ मोरे (वय २१, रा. प्रसाद नगर, राहुरी फॅक्टरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचे पती नवनाथ भाऊसाहेब मोरे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित आरोपी नवनाथ मोरे हा हॉटेलमध्ये कुक म्हणून काम करतो. २२ जून २०२६ रोजी सायंकाळी नवनाथ मोरे घरातून बाहेर गेले होते. रात्री फिर्यादीचा भाऊ धरम तायडे हा त्यांच्या घरी आला असता, नवनाथ यांनी त्याला फोनवरून शिवीगाळ केल्याचे त्याने बहिणीला सांगितले.यानंतर रात्री साडेअकराच्या सुमारास नवनाथ मोरे घरी आले. जेवण देण्यासाठी पत्नी बाहेर गेली असता, त्यांनी कोणतेही कारण नसताना पत्नीला शिवीगाळ व मारहाण केली आणि तेथून निघून गेले. या प्रकारामुळे कुटुंब भयभीत झाले होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६०८**

**दिनांक - २९/०६/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रंजित प्रभाकर दिवटे रा. अंबढ ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | रित्वी रंजित दिवटे | मुलगी | ०८/०९/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-/ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

## रेल्वे विभागाला ग्राहक मंचाचा दणका;प्रवाशांना ७५ हजारांची भरपाई!

जालना। प्रतिनिधी

पालक्काड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने भारतीय रेल्वेच्या गलथान कारभाराला चपराक लावणारा एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. आरक्षित डब्यात अनधिकृत प्रवाशांच्या गर्दीमुळे झालेल्या त्रासाबद्दल रेल्वेला 'सेवेतील त्रुटी'साठी जबाबदार धरत, तक्रारदार कुटुंबाला ५०,००० रुपये नुकसान भरपाई आणि २५,००० रुपये खटल्याचा खर्च देण्याचे आदेश दिले आहेत. या निकालामुळे देशभरातील रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, आपल्या हक्कांसाठी कसे लढावे याचा



एक उत्तम आदर्श निर्माण झाला आहे, अशी प्रतिक्रिय ॲड. महेश एस. धन्नावत यांनी दिली. या प्रकरणात, तक्रारदार पार्थसारथी टी. आणि त्यांचे कुटुंबीय (तक्रारदार) यांनी १० डिसेंबर २०२३ रोजी कन्याकुमारी-पुणे एक्सप्रेसने प्रवास करण्यासाठी आरक्षित तिकीट काढले होते. जेव्हा ते रेल्वेत चढले, तेव्हा त्यांच्या आरक्षित जागांवर आधीच विनातिकीट आणि अनधिकृत प्रवाशांनी कब्जा केला होता. संपूर्ण डब्यात प्रचंड गर्दी होती आणि लोक खाली जमिनीवर, बर्थखाली झोपले होते. यामुळे तक्रारदारांना, विशेषतः ज्येष्ठ नागरिक असलेल्या सदस्यांना, प्रचंड शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला. शौचालयात जाणेही कठीण झाले होते.

तक्रारदारांनी या समस्येबद्दल रेल्वेच्या 'रेल मदद' ॲपवर छायाचित्रांसह तक्रार दाखल केली. रेल्वे सुरक्षा दल आणि तिकीट तपासनीस यांना माहिती देऊनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. रेल्वे प्रशासनाने न्यायालयात दावा केला की त्यांनी तक्रारीनंतर अनधिकृत प्रवाशांना हटवले होते, परंतु ते आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ कोणताही पुरावा, जसे की टीटीई किंवा इतर कर्मचाऱ्यांची साक्ष, सादर करू शकले नाहीत. याउलट, तक्रारदारांनी सादर केलेले फोटो डब्यातील भीषण परिस्थिती स्पष्टपणे दर्शवत होते. या निकालावर बोलताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''हा निकाल म्हणजे ग्राहक हक्काचा मोठा विजय आहे.

रेल्वेचे आरक्षित तिकीट म्हणजे केवळ प्रवासाचा परवाना नाही, तर तो रेल्वेने प्रवाशाला दिलेल्या सुरक्षित आणि आरामदायक प्रवासाच्या सेवेचा करार आहे. आरक्षित डब्यात अनधिकृत प्रवाशांना रोखण्यात अपयशी ठरणे ही रेल्वेची स्पष्टपणे सेवेतील त्रुटी आहे. पालक्काड ग्राहक आयोगाने ग्राहक तक्रार क्रमांक डीसी/५६३/सीसी/५२९/२०२४ मध्ये दिलेला हा निर्णय रेल्वे प्रशासनाच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ''या निकालातून महाराष्ट्र आणि विशेषतः जालना येथील प्रवाशांनी बोध घेतला पाहिजे. अनेकदा अशा घटनांकडे दुर्लक्ष केले जाते, पण या तक्रारदारांप्रमाणे आपणही जागरूक राहिले पाहिजे. प्रवासादरम्यान गैरसोय झाल्यास त्याचे फोटो, व्हिडिओ काढा, 'रेल मदद' ॲपवर किंवा रेल्वेच्या अधिकृत पोर्टलवर लेखी तक्रार करा. हाच पुरावा न्यायालयात तुमची बाजू मजबूत करतो. रेल्वेने आपली जबाबदारी ओळखून प्रवाशांना चांगली सेवा द्यावी, अन्यथा त्यांनाही अशाच दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल. आयोगाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, प्रवाशांनी संपूर्ण प्रवास पूर्ण केल्यामुळे तिकीटाची रक्कम परत केली जाणार नाही. तथापि, रेल्वेच्या निष्काळजीपणामुळे तक्रारदारांना जो मानसिक आणि शारीरिक त्रास झाला, त्याची भरपाई करणे आवश्यक आहे. त्यानुसार, आयोगाने प्रतिवादी क्रमांक १ ते ४, म्हणजेच भारतीय रेल्वे मंत्रालय आणि संबंधित अधिकाऱ्यांना, आदेशाच्या ४५ दिवसांच्या आत एकूण ७५,००० रुपयांची रक्कम तक्रारदारांना देण्याचे निर्देश दिले आहेत.

**टीसी हरवला आहे**

सुजल उद्धव डोंगरे या नावाचा इ.१२ वी पास चा टीसी (दाखला) बीड ते तागडगाव पाथर्डी बस प्रवासामध्ये हरवला आहे सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क ::- मो. ७३५०४४३०८७**

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

मंगळवार दि.३० जून २०२६



# बीड जिल्ह्यात नागझरी गावचे अस्तित्वच नाही!

## ग्रामस्थ १९८६ पासून लढतात अस्तित्वाचा लढा; सोमवारची बैठक फोल, अधिकारीच गैरहजर

बीड । प्रतिनिधी

पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीचा प्रश्न सुटावा म्हणून सन १९८६ साली केज तालुक्यात असलेल्या कुंडलिका मध्यम प्रकल्पाची निर्मिती झाली. या प्रकल्पामध्ये नागझरी (गायमुख) या गावची जमीन आणि घरे या प्रकल्पात गेली त्यांचे तात्पुरत्या स्वरूपात माजलगाव तालुक्यामध्ये खानापूर जवळ पुनर्वसन करण्यात आले. मात्र अद्यापही या गावचे जिल्ह्यात गॅझेट मध्ये अस्तित्वच नाही. प्रशासन प्रत्येक वेळी दुर्लक्ष करते लोकप्रतिनिधींचेही या प्रश्नाकडे लक्ष नाही. सन १९८६ पासून नागझरीचे ग्रामस्थ हा लढा सातत्याने लढतात मात्र त्याला यश येत नाही. सोमवार दिनांक २९ जून रोजी या संदर्भात माजलगाव उपविभागीय कार्यालयात या संदर्भात बैठक घेण्यात आली. मात्र या बैठकीला नायब तहसीलदार सोडता कोणताही अधिकारी उपस्थित राहिला नाही. यावरून या प्रश्नाचे प्रशासनाला किती गांभीर्य आहे याचा प्रत्यय येतो. विशेष म्हणजे ज्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी ही बैठक आयोजित केली होती ते ही या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. ही नागझरी ग्रामस्थांची शोकांतिका आहे. हा प्रश्न कधी सुटणार याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. या संदर्भात उपविभागीय कार्यालयाकडे आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे अनेक वेळा खेटे घालूनही नागझरी करांना न्याय मिळत नाही.

सन १९८६ मध्ये पूर्वी केज तालुका असलेल्या आणि नंतर धारूर तालुक्यात आलेल्या मध्यम प्रकल्प उपळी या प्रकल्पामध्ये नागझरी (गायमुख ) हे गाव संपुष्टात आले. याचे तात्पुरत्या स्वरूपात माजलगाव तालुक्यामध्ये पुनर्वसन करण्यात आले. मात्र या गावाला ग्रामपंचायत आहे, ना शाळा आहे, ना पोस्ट ऑफिस आहे, ना अंगणवाडी आहे या गावची लोकसंख्या खानापूरला जोडल्याचे सांगण्यात येते, मात्र खानापूरच्या ग्रामपंचायतीने आमचा आणि या लोकांचा संबंध नाही असे पत्र मागेच जिल्हा प्रशासनाला दिलेले आहे. त्यामुळे नागझरी ग्रामस्थांची अवस्था ना घर काना घाट का अशी झाली आहे. या संदर्भात अनेक वेळा बैठका झाल्या. मात्र हा प्रश्न सुटला नाही. लोकप्रतिनिधींचे याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. मध्यंतरीच्या काळात जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठक घेतली. मात्र त्यांच्या डोक्यात हा विषय शिरलेला दिसत नाही. अनेक वेळा बैठका होतात. मात्र या बैठकीला ना पुनर्वसन अधिकारी असतात ना महसूल अधिकारी. त्यामुळे या प्रत्येक वेळी बैठका फोल ठरतात. अशीच एक बैठक सोमवार दिनांक २९ जून रोजी माजलगाव उपविभागीय कार्यालयात ठेवण्यात आली होती. या संदर्भात धारूर व माजलगाव चे तहसीलदार, या दोन्ही तालुक्याचे गटविकास अधिकारी, या दोन्ही तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी, या दोन्ही तालुक्याचे बालविकास प्रकल्प अधिकारी, माजलगावचे मंडलाधिकारी, धारूरचे मंडलाधिकारी, खानापूरचे तलाठी तसेच आंबेवडगाव चे ◀◀ पान ३ वर

### बैठकीला अधिकाऱ्यांची दांडी

नागझरीच्या पुनर्वसनासंदर्भात माजलगावच्या उपविभागीय कार्यालयात बैठक ठेवण्यात आली या बैठकीला माजलगाव व धारूर चे तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, मंडलाधिकारी तसेच खानापूर आणि आंबेवडगाव या दोन गावचे तलाठी यांना बैठकीला उपस्थित राहण्यासाठी पत्र देण्यात आले होते. मात्र यातील एकही अधिकारी या बैठकीला उपस्थित राहिला नाही. पुनर्वसन अधिकारीही या बैठकीला उपस्थित नव्हते. विशेष म्हणजे ज्यांनी बैठक बोलावली ते उपविभागीय अधिकारीही या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. यावरून या प्रश्नाचे प्रशासनाला किती गांभीर्य आहे हे लक्षात येते.

### लोकप्रतिनिधींचेही दुर्लक्ष

नागझरी( गायमुख) या गावच्या पुनर्वसना संदर्भात या भागातील अनेक लोकप्रतिनिधी होऊन गेले. मात्र एकाही लोकप्रतिनिधींनी आतापर्यंत या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. सध्या दोन्ही तालुक्याचे आमदार प्रकाश दादा सोळंके हे आहेत. किमान त्यांनी तरी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन हा प्रश्न सोडवावा अशी अपेक्षा नागझरी (गायमुख) ग्रामस्थांची आहे

## गेवराईत अवैध वाळू वाहतूक करणारा पिकअप जप्त; ८ लाखांचा मुद्देमाल ताब्यात

गेवराई । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशानुसार, अवैध धंद्यांविरुद्ध पुकारलेल्या धडक मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. शहरात अवैध वाळू वाहतूक करणारा अशोक लिलँड बडा दोस्त पिकअप पोलिसांनी पकडला असून, ८ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई पोलीस पथक २९ जून २०२६ रोजी रात्री शहरात गस्त घालत होते. पहाटे २ वाजण्याच्या सुमारास कोल्हेर रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ एक पांढऱ्या-पिवळ्या रंगाचा अशोक लिलँड पिकअप (क्रमांक १६२५९१) संशयास्पद



स्थितीत दिसून आला. या वाहनात विनापरवाना आणि बेकायदेशीररित्या वाळूची चोरी करून तिची वाहतूक केली जात होती.

चालक अंधाराचा फायदा घेऊन पसार

पोलीस पथकाने सदर वाहन थांबवण्याचा इशारा केला असता, चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला उभे केले आणि अंधाराचा फायदा घेऊन तो तिथून पळ काढण्यात यशस्वी झाला. याप्रकरणी अज्ञात वाहन चालक आणि मालकाविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यात सपोनि अतुलकुमार लांडगे, ग्रेपोउपनि सुरेश पारधी, गोरक्ष डोके, रामराजे काकडे, दत्ता भंडारे आणि नारायण सरवदे यांनी सहभाग घेतला.

## शिला सोनवणे यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा

फुलसांगवी । प्रतिनिधी

येथील जि.प. केंद्र माध्यमिक शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षिका श्रीमती शिला विठ्ठलराव सोनवणे यांची शिक्षण सेवेतील प्रदीर्घ सेवेतून नियत वयोमानानुसार मंगळवार दि. ३० जून रोजी सेवानिवृत्ती होत असून, या सेवानिवृत्तीचा सन्मान सोहळा आज मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये होत आहे.



शिरूर कासार तालुक्यातील फुलसांगवी येथील प्राथमिक पदवीधर शिक्षिका श्रीमती शिला विठ्ठलराव सोनवणे यांची दि. २७ जून १९८९ रोजी गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील जि. प. प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती झाली होती. एक महिन्यात भर या ठिकाणी सेवा समर्पित केल्यानंतर त्यांची फुलसांगवी येथील शाळेमध्ये नियुक्ती झाली. या सहशिक्षिकेने आपल्या या कार्यकाळामध्ये अगदी जीव ओतून या ठिकाणी विद्यार्थी घडवण्याचे पवित्र कार्य अनेक वर्ष या ठिकाणी केली आहे. यामुळे त्यांची सन २०१० मध्ये प्राथमिक पदवीधर शिक्षिका म्हणून नियुक्ती झाली होती. आपल्या सेवा समर्पणाच्या कार्य काळामध्ये श्रीमती शीला सोनवणे यांनी अगदी तळमळीने ग्रामीण भागातील विद्यार्थी विद्यार्थिनीला घडवण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण भाग भागातील मुलींशी अगदी मैत्रीचे नाते ठेवून त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनावरती आपला प्रभाव कायम ठेवला आहे.यामुळे आजही शाळाबाह्य झालेली विद्यार्थी - विद्यार्थिनी या शिक्षिकेसोबत आजवरही मैत्रीपूर्ण गुरु- शिष्याचे नाते मोठ्या प्रेमाने जोपासत आहेत. आज श्रीमती शिला सोनवणे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा आहे. हा सोहळा एक स्मरण सोहळा व्हावा यासाठी येथील शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्याचबरोबर ग्रामपंचायत फुलसांगवी - मार्कडवाडी च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी हा सोहळा मोठ्या थाटामध्ये श्री. संत वामनभाऊ महाराज यांच्या आयोजन केले आहे. या सोहळ्यासाठी श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे ◀◀ पान ३ वर

## तालखेड शिवारात संशयास्पद मृतदेह सापडला

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील तालखेड परिसरात एका व्यक्तीचा संशयास्पद मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच माजलगाव ग्रामीण पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. मृत व्यक्तीची ओळख विकास वाघमोडे (रा. किट्टीआडगाव, ता. माजलगाव) अशी झाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, विकास वाघमोडे यांचा मृतदेह तालखेड येथे आढळून आला. या घटनेबाबत मृताच्या नातेवाईकांनी





घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला असून, घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी पंचनामा पूर्ण करून मृतदेह शवविच्छेदनासाठी माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात पाठविला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.दरम्यान, माजलगाव ग्रामीण पोलीस विविध अंगांनी या प्रकरणाचा तपास करत असून, मृत्यू नेमका कशामुळे झाला याचा शोध घेत आहेत. पोलिसांच्या तपासानंतरच या घटनेमागील सत्य समोर येणार असून, परिसरात या घटनेची जोरदार चर्चा सुरू आहे.

## पाटोदा-अक्कलकोट बससेवा सुरु करण्याची ग्रामस्थांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही आणि परिसरातील प्रवाशांची गैरसोय लक्षात घेता, पाटोदा-अक्कलकोट ही नवीन एस.टी. बस सेवा आठवड्यातून एकदा, म्हणजेच प्रत्येक गुरुवारी सुरू करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पाटोदा आगाराकडे करण्यात आली आहे.

स्थानिक रहिवासी आदित्य दत्तात्रय लांडगे आणि परिसरातील प्रवाशांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पाटोदा तालुक्यातील सोनेगाव, वैद्यकिन्ही, लिंबागणेश, वैजाळा, पाचेगाव, पाचंग्री, भायाळा, बेनसुर आणि वाघीरा या गावांसह पंचक्रोशीतील प्रवाशांची संख्या मोठी आहे. भाविक आणि सामान्य प्रवाशांच्या सोयीसाठी ही बस सेवा सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. ही बस पाटोदा-वैद्यकिन्ही-लिंबागणेश-माजरसुंबा या मार्गाने चालवण्यात यावी, जेणेकरून जास्तीत जास्त प्रवाशांना याचा लाभ घेता येईल. या मागणीला पाठिंबा दर्शवत परिसरातील अनेक ग्रामस्थांनी स्वाक्षरी करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. आता एस.टी. प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## चहा विकणारे धनराज दिवटे यांची कन्या प्रिती हिची निलसॉफ्ट कंपनीमध्ये इंजीनियरिंगपदी निवड

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु.प्रिती धनराज दिवटे हीने शासकीय अभियांत्रिकीय संशोधन महाविद्यालय,अवसरी खुर्द येथून सिव्हिल इंजीनियरिंग पदवी यशस्वीरित्या पूर्ण करून कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निलसॉफ्ट या नामांकित कंपनीमध्ये तिची निवड झाल्याबद्दल दि.२९-०६-२०२६ सोमवार रोजी महाराणी ताराबाई शाळेत प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे / डोईफोडे



मॅडम तसेच उपप्राचार्य मस्के सर, पर्यवेक्षक धाईतिडक सर,अर्थ विभाग प्रमुख श्री.डोईफोडे सर यांच्या हस्ते शाल,बुके देऊन पालकासह तिचा सत्कार करून गुणगौरव करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरांमध्ये छोटेसे चहाचे हॉटेल चालवणारे श्री.धनराज ◀◀ पान ३ वर

## युसूफवडगांव येथे वटपौर्णिमा सण उत्साहात साजरा

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथे आज वटपौर्णिमा सण मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला.गावातील विवाहित महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून वडाच्या झाडाची विधीवत पूजा केली. पतीच्या दीर्घायुष्यासाठी,उत्तम आरोग्यासाठी व सुखी संसारासाठी महिलांनी वडाच्या झाडाभोवती दोरा गुंडाळून प्रदक्षिणा घालत प्रार्थना केली.





महिलांनी एकमेकींना वटपौर्णिमेच्या शुभेच्छा देत कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी मंगलकामना व्यक्त केल्या.गावातील मंदिर परिसर व वडाच्या झाडाजवळ सकाळपासून भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. वटपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीतील श्रद्धा,निष्ठा आणि कौटुंबिक मूल्यांचे प्रतीक मानला जातो.या सणानिमित्त परिसरात आनंदी व भक्तिमय वातावरण निर्माण झाले.नुसते झाडाचे पुजन करून जमणार नाही तर महिलांनी निसर्गाच्या संवर्धनासाठी काम करण्याची गरज आहे म्हणून यावेळी वडपुजेसाठी आलेल्या प्रत्येक महिलांनी आपल्या-आपल्या घरी एक-एक वृक्ष लावुन त्यांचे संगोपन करावे असे आवाहन पुजारी शिवराज स्वामी यांनी केले.

## हरित क्रांतीनंतर आता धवलक्रांतीकडे आष्टीची वाटचाल

### शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आ.सुरेश धस यांचा नवा आराखडा

आष्टी । प्रतिनिधी

एकेकाळी दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतीतील अनिश्चिततेमुळे ओळखल्या जाणाऱ्या आष्टी मतदारसंघाची ओळख आता वेगाने बदलत आहे. जलसंधारणाच्या प्रभावी कामांमुळे पाण्याचा प्रश्न मार्गी लागत असतानाच, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी आता धवलक्रांतीचा नवा अध्याय सुरू करण्याच्या दिशेने आमदार सुरेश धस यांनी ठोस पाऊल उचलले आहे.



जलसंधारणातून बदलले आष्टीचे चित्र

मतदारसंघातील तलाव गाळमुक्त करणे, पाणी साठवण क्षमता वाढविणे, नाले खोलीकरण, जलसंधारणाची विविध कामे आणि भूजल पुनर्भरण यामुळे अनेक गावांतील विहिरी, बोअरवेल आणि जलस्रोतांच्या पाण्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. पावसाचा प्रत्येक थेंब अडविण्याच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या कामांमुळे भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय उभा राहत असल्याचे चित्र आहे.

खुंटेफळ प्रकल्प ठरणार शेतकऱ्यांसाठी संजीवनी

सध्या अंतिम टप्प्यात असलेला खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर आष्टी तालुक्यातील तब्बल ८० टक्क्यांहून अधिक शेतीक्षेत्र ओलिताखाली येण्यास मदत होणार आहे. सिंचनाची उपलब्धता वाढल्याने उत्पादनात वाढ, पीकपद्धतीत बदल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

आता दुग्धव्यवसायावर भर; शेतकऱ्यांसाठी नियमित उत्पन्नाचा मार्ग

केवळ पाणी उपलब्ध करून थांबण्याऐवजी शेतकऱ्यांना वर्षभर आर्थिक स्थैर्य मिळावे, या उद्देशाने आ. सुरेश धस यांनी शेतीसोबत दुग्धव्यवसायाला प्रोत्साहन देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला

◀◀ पान ३ वर

# चाकरवाडी येथे माऊली भक्तींचा जनसागर उसळला

## माणसाला देव बनवण्यास माऊली दादांचा अवतार -ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील, संत महंतांच्या उपस्थितीत माऊलींचा पुण्यतिथी सोहळा

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत सदगुरू ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या २६ व्या पुण्यस्मरणानिमित्त तपोनिधी शांतीब्रह्म महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सांगता लाखो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. या पुण्यतिथी सोहळ्यास लाखो भाविकांचा जनसागर उसळला होता.

वटसावित्री पौर्णिमेच्या दिवशी वै.संत सदगुरू ज्ञानेश्वर महाराज माऊली यांच्या पुण्यस्मरणार्थ सोमवारी चाकरवाडी येथे माऊली भक्तांचा जनसागर उसाळाला.

प्रतिवर्षी प्रमाणे रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे माऊली दादांच्या पुण्यतिथी निमित्त काल्याचे किर्तन होत असते परंतु रामराव महाराज ढोक आजारी असल्या कारणास्तव यावर्षी ह भ प जगन्नाथ महाराज पाटील यांचे काल्याचे किर्तन चाकरवाडी येथे संपन्न झाले. माऊली दादा यांनी संसारात राहून परमार्थ केला. माऊलींनी जगाच्या कल्याणासाठी परमात्म्याला आपलंसं करून घेतलं आणि माऊली दादांनी परमात्म्याच्या केलेल्या सेवेमुळे आज चाकरवाडीचे वैभव हे दिसत आहे. जनसामान्य माणसाला देव बनवण्यासाठी माऊली दादांनी या जगामध्ये अवतार घेतला माऊली दादा हे भूतलावरील साक्षात परब्रम्ह तत्व आहे असे ह भ प भाषाप्रभू जगन्नाथ महाराज पाटील श्री संत नामदेव महाराज किर्तन विद्यालय मुंबई यांनी काल्याच्या कीर्तनावेळी अभंग विवेचन केले

माऊली दादाच्या पुण्यसमरणार्थ आयोजित अखंड हरिनाम सप्ताह मध्ये काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद्? भागवत कथा, गाथा भजन, हरिपाठ ,अभंग वाणी ,प्रवचन ,हरी किर्तन, भारुड, हरिजागर, अखंड हरिनाम सप्ताह मध्ये भक्तिमय वातावरणात माऊली भक्त मंत्रमुग्ध झाले. ◀◀ पान ३ वर



### माऊली दादापासून अन्नयज्ञ सुरु

श्री क्षेत्र चाकरवाडी येथे संत माऊली दादा यांनी भाविक भक्तांना २४ तास व बाराही महिने अन्नदानाची व्यवस्था माऊली दादांनी सुरू केली ही परंपरा पुढे तपोनिधी शांतीब्रह्म महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांनी अविरत सुरू ठेवली महाराष्ट्रातील एकमेव अद्वितीय असे तीर्थक्षेत्र आहे येथे विनामूल्य २४ तास व बारा महिने अन्नदानाची सेवा केली जाते.

### महाप्रसादाची महापंगती

माऊली दादांच्या पुण्यस्मरणानिमित्त लाखो भाविक भक्तांचा जनसागर माऊली दादांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी उपस्थित झाला होता. अखंड हरिनाम सप्ताह काल्याचे कीर्तन सेवा झाल्यानंतर या लाखो भाविक भक्तांच्या महाप्रसादाच्या महापंक्ती उठवण्याचे काम माउली दादांच्या दरबारामध्ये करण्यात आले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk